## केरळमध्ये शाळेबाहेर सापडली स्फोटके

**केरळ :** केरळमधील पलक्कड जिल्ह्यातील वडकंथरा येथील एका शाळेच्या कॅम्पसबाहेर बुधवारी धोकादायक स्फोटके जप्त करण्यात आली. पोलिसांच्या एफआयआरमध्ये ही स्फोटके अत्यंत धोकादायक असल्याचे पुष्टी करण्यात आली आहे. पोलिसांनी सांगितले की, बुधवारी संध्याकाळी एका विद्यार्थ्याने स्फोटकांपैकी एक उपकरण फेकले. ज्याचा वापर रानडुकरांना मारण्यासाठी केला जात असल्याचा संशय होता. त्यामुळे स्फोट झाला. यात विद्यार्थी आणि जवळच असलेल्या एका वृद्ध महिलेला किरकोळ दुखापत झाली. एफआयआरमध्ये असे म्हटले आहे की, १० वर्षीय नारायणन या विद्यार्थ्याने दुपारी ३.४५ वाजता वडाकंठरा येथील व्यास विद्या पीडोम प्री-प्रायमरी स्कूलच्या •> पान २ वर


# कृषीवल

रायगड, शुक्रवार, दि. २२ ऑगस्ट २०२५

किंमत ४ ₹







वे|ध|क

## सिंहगडावरुन युवक कोसळला

**पुणे :** पुण्यातील सिंहगड किल्ल्याच्या तानाजी कड्यावरून खोल दरीत कोसळून एक पर्यटक बेपत्ता झाल्याची घटना घडली आहे. सिंहगड किल्ल्याच्या तानाजी कडा येथे हवा पॉइंटजवळील खोल दरीत पाय घसरून पडल्याने पर्यटक बेपत्ता झाला असून घटनास्थळी प्रशासन व पोलीस कर्मचारी पोहोचले आहेत. गौतम गायकवाड (वय २४) असे बेपत्ता तरुणाचे नाव असून त्याच्यासाठी शोधमोहिम राबवली जात आहे. गौतम हा हैदराबादवरुन मित्रांसमवेत पर्यटनास आला होता. हैदराबाद येथून गौतमसह ५ जणांचा ग्रुप पुणे येथे फिरण्यासाठी •> पान २ वर

## शाळेत विद्यार्थ्याचा खून

**अहमदाबाद :** येथील एका खासगी शाळेतील एका विद्यार्थ्याने मंगळवारी दहावीत शिकणाऱ्या विद्यार्थ्याचा चाकूने वार करत खून केल्याचा खळबळजनक प्रकार घडला. या प्रकाराने संतप्त झालेल्या नागरिकांनी बुधवारी सकाळी शाळेच्या खोल्यातील फर्निचरची मोडतोड केली आणि कर्मचाऱ्यांना मारहाण केली. याप्रकरणी अल्पवयीन मुलास ताब्यात घेतले असून, शांतता बाळगण्याचे आवाहन शिक्षणमंत्र्यांनी केले. अहमदाबादच्या खोखरा भागात सेवंथ डे ॲडव्हेंटिस्ट •>पान२ वर

## रोहित पवार यांना जामीन मंजूर

**मुंबई :** राज्याची शिखर बँक असलेल्या महाराष्ट्र राज्य सहकारी बँक (एमएससीबी) घोटाळ्याशी संबंधित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) आमदार रोहित पवार यांना विशेष सत्र न्यायालयाने गुरुवारी जामीन मंजूर केला. या प्रकरणी तपास यंत्रणेने अटक केलेली नाही. शिवाय, रोहित यांच्याविरुद्ध सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) नुकतेच आरोपपत्र दाखल केले होते. या पार्श्वभूमीवर रोहित पवार यांनी जामीन देण्याची मागणी केली होती. ती विशेष न्यायालयाने मंजूर केली.

# मासेमारी संकटात

### रायगडात कोट्यवधींचा बाजार ठप्प | १०० कोटींच्या निर्यात व्यवसायावर परिणाम

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**खराब हवामानामुळे गेल्या सहा दिवसांपासून रायगड जिल्ह्यातील प्रमुख मच्छीमार बंदरातील मासेमारी बंद आहे. तर पुढील आणखी चार दिवसही धोक्याचे आहेत. त्यामुळे या बंदरातील जवळपास १०० कोटींच्या निर्यात व्यवसायावर परिणाम झाला आहे. या बंदरातून दिवसाला किमान सुमारे १० कोटींच्या मासळीची उलाढाल होत होती. ती आज ठप्प झाली आहे. परिणामी, येत्या काळात मासळीची दरवाढीही होण्याची शक्यता आहे. एकीकडे डिझेल परतावा आणि दुसरीकडे वातावरणातील बदल यामुळे रायगड जिल्ह्यातील मच्छिमार बांधव हवालदिल झाले आहेत. कोट्यवधींची होणारी उलाढाल ठप्प झाली असून परकीय चलनाच्या उद्दिष्टाला ब्रेक लागला आहे.**



रायगड जिल्ह्यातील करंजा, अलिबाग, रेवदंडा, नवगाव, रेवस, एकदरा, राजपुरी, दिघी, जीवनाबंदर या बंदरांवर मासळीचे लिलाव केले जातात. या सर्व बंदरांच्या माध्यमातून देशातील सर्वात मोठे मासळी निर्यातीचे हब रायगड जिल्ह्यात बनण्याची चिन्हे आहेत. अरबी समुद्रात पकडलेल्या रिबन फिश, कटल, माकोल, नळ, कुपा, बांगडा आदी प्रकारच्या मासळीची निर्यात युरोप, थायलंड, व्हिएतनाम, हाँगकाँग, सिंगापूर, •> पान २ वर

### मासेमारी बंदरे अद्यावत करण्यावर शासनाचा भर

**मच्छिमारांच्या बोटी मासळी उतरविणे, विक्रीसाठी मुंबईतील एकमेव ससून डॉक बंदराच्या आश्रयाला जात होत्या. ससूनडॉक बंदरावरील वाढता ताण लक्षात घेऊनच करंजा येथेच उपयुक्त जागेत अद्यावत मच्छिमार बंदर उभारण्यात आले आहे. अलिबाग, श्रीवर्धनचे जीवना बंदर आदी बंदरे अद्यावत करण्यावर भर देण्यात येत आहे. या मच्छिमारांसाठी आवश्यक लागणारे साहित्य पुरविण्यासाठी जाळी, रंग, सामान पुरवठा करणारे हार्डवेअर, वर्कशॉप्स, जाळींची दुकाने अद्यावत आहेत. परंतु या वस्तुंचे मोठे मार्केट मुंबईमध्येच आहे. काही ठिकाणी बोटी दुरूस्ती वर्कशॉप्समध्ये तयार करण्यात आल्या आहेत. या वर्कशॉप्समध्ये मच्छिमार बोटींसाठी लागणारे पंखे, टनट्युब, सॉफ्ट आदी यांत्रिक साहित्याला थेट विदेशातून मोठी मागणी आहे.**

## शेवग्याच्या शेंगांनी घेतला बळी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील सावेळे ग्रामपंचायतमधील साळोखवाडी येथे शेवग्याच्या शेंगा काढण्यासाठी झाडावर चढलेल्या तिघांना विजेचा धक्का लागला. यामध्ये दोघांचा मृत्यू झाला तर एकजणी जखमी झाल्याची घटना घडली. जखमी महिला गंभीर जखमी असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

बारणे गावच्या पुढे साळोख वाडी असून त्या वाडीमध्ये राहणारे रामचंद्र मोतीराम वाघमारे हे घरच्या बाजूला असलेल्या शेवग्याच्या शेंगा काढण्यासाठी झाडावर चढले. त्या झाडाच्या बाजूने महावितरण विजेचा प्रवाह जात होता. मात्र पाऊस पडत असल्याने विजेच्या तारा खाली लोंबकळत होत्या आणि त्याची माहिती वाघमारे यांना नव्हती. त्यावेळी शेंगा काढणारे रामचंद्र वाघमारे आणि शेंगा घेण्यासाठी झाडाखाली असलेल्या पार्वती रामचंद्र वाघमारे तसेच सुनिता गोपाळ वाघमारे यांना त्या विजेच्या तारांचा धक्का बसला. यामध्ये रामचंद्र आणि पार्वती यांचा जागीच मृत्यू झाला.तर सुनीता गोपाळ वाघमारे ही जखमी झाली. स्थानिकांनी तिला तात्काळ कडाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी नेले.

या अपघाताची माहिती मिळताच कर्जत तहसीलदार डॉ. धनजंय जाधव तसेच महसूल आणि पोलीस विभागाचे कर्मचारी तात्काळ घटनास्थळी पोहचले. त्या घटनेचा पंचनामा करण्यात आला असून जखमी असलेल्या सुनीतावर उपचार सुरू आहेत. कर्जत तालुक्यात मे महिन्यात झालेल्या पावसामुळे आलेल्या महापुरात नेरळ जवळील बीरडोळे येथील शेतात गेलेला मुलगा याच्या अंगावर वीज पडून मृत्यू झाला होता.

## विद्यार्थ्यांसाठी एसटी सेवा सुरळीत करा

### शेतकरी कामगार पक्षाची मागणी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

नवघर पूल धोकादायक असल्याने अलिबाग-रोहा (रामराज मार्गे) जाणारी एसटी बस सेवा बंद करण्यात आली आहे. त्यामुळे ही वाहतूक कुर्डुस मार्गे वळवण्यात आली होती. ती आता १५ ऑगस्ट नंतर बंद करण्यात आली. परंतु ती एसटी तातडीने सुरू करण्यात यावी, अशी ठाम मागणी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे. शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड मानसी म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली शेकापच्या शिष्टमंडळाने स्थानक प्रमुखांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले.



यावेळी शेकाप अलिबाग तालुका चिटणीस सुरेश घरत, तालुका युवक अध्यक्ष विक्रांत वार्डे, तालुका महिला आघाडी प्रमुख नागेश्वरी हेमाडे, अलिबाग तालुका सोशल मिडीया प्रमुख संजना किर, अंजली ठाकूर, अभिजित वालंज, जमाल सय्यद, ॲड. निनाद रसाळ, यश पाटील, ॲड. अश्विनी ठोसर, ॲड. अनिकेत म्हात्रे अक्षय डिकले, नितीन जानकर यांच्यासह शेतकरी कामगार पक्षाचे अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

दोन वर्षांपासून नवघर गावाजवळील पूल धोकादायक अवस्थेत असल्याने एसटीची बस सेवा बंद करण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी, महिला-पुरुषांना नोकरीसाठी तसेच नागरिकांना दैनंदिन कामांसाठी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. रोहा परिसरातील शासकीय व निमशासकीय कार्यालयांना जाण्यास •> पान २ वर

## सरकारी वकिलाने कोर्टातच संपवल जीवन

**। बीड । वृत्तसंस्था ।**

जिल्ह्याच्या वडवणी येथील न्यायालयात सत्काराच्या शालनेच गळफास घेत सरकारी वकिलाने जीवन संपवल्याची धक्कादायक घटना घडली. आता याप्रकरणी आत्महत्या केलेल्या सरकारी वकील व्ही.एल. चंदेल यांच्या कुटुंबियांनी त्यांच्या आत्महत्येची चौकशी करण्याची मागणी केली आहे. त्यांच्यावर कुणाचा तरी दबाव होता, त्यांनी मृत्युपूर्वी लिहून ठेवलेली चिठ्ठी पोलिसांनी आम्हाला दाखवली नाही. त्या चिठ्ठीत नेमका काय उल्लेख आहे, तो आम्हाला माहिती नाही. परंतु, जे कुणी यात दोषी असतील त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी चंदेल कुटुंबियांनी केली आहे. •> पान २ वर

### घटनेची सीआयडी चौकशी व्हावी

**बीड जिल्ह्याच्या वडवडणी येथील न्यायालयात सरकारी वकिलाने आत्महत्या केल्याने खळबळ उडाली होती. ही घटना गुरुवारी सकाळी सुमारास ११ वाजता उघडकीस आली. न्यायालयाच्या खिडकीला शाल बांधून त्यांनी हे टोकाचं पाऊल उचलल्याचे पाहायला मिळालं. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. मात्र, या मृत्यूप्रकरणी आता गूढ वाढले असून कुटुंबियांनी घटनेच्या सीआयडी चौकशीची मागणी केली आहे. दरम्यान, पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.**


## १०५ वी जयंती



कै. जयराम रामचंद्र पाटील
(जन्म २९ ऑगस्ट १९२०)
कै. नारायण नागू पाटील यांचे जावई यांची आज तिथीनुसार १०५ वी जयंतीनिमित्त
विनम्र अभिवादन
विनित
नातवंडे : सौ. मृणाल व श्री.नृपाल दत्तात्रेय घरत,
पतवंडे : कु. तनिष दंताळे व कु. प्रतोश नृपाल घरत


## आम्हाला तुमचाही पाठिंबा हवा

### देवेंद्र फडणवीसांचा थेट शरद पवारांना फोन

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

लोकसभा, विधानसभा निवडणुकांनंतर सध्या राज्याचे लक्ष लागले ते स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकडे. मात्र, तत्पूर्वीच उपराष्ट्रपती जगदीश धनकड यांनी आपल्या पदाचा अचानक राजीनामा दिल्याने उपराष्ट्रपतीपदाची निवडणूक जाहीर झाली आहे. भाजप एनडीएकडून उपराष्ट्रपतीपदासाठी महाराष्ट्राचे राज्यपाल सी. राधाकृष्णन यांना उमेदवारी जाहीर करण्यात आल्याने ही निवडणूक बिनविरोध व्हावी, अशीच भाजपची इच्छा आहे. मात्र, काँग्रेस इंडिया आघाडीकडूनही उमेदवार जाहीर करण्यात आला आहे. विशेष म्हणजे प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत बी. सुदर्शन रेड्डी यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. तत्पूर्वी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंना फोन केला.

उपराष्ट्रपती पदासाठी एनडीए उमेदवार सी. पी. •> पान २ वर






## कर्मचाऱ्यांच्या संपामुळे आरोग्य सेवा ठप्प



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

समाजयोजनासह विविध प्रलंबित मागण्यांसाठी रायगड जिल्ह्यातील एनआरएचएम तथा राष्ट्रीय आरोग्य अभियान अधिकारी, कर्मचाऱ्यांनी गेल्या दोन दिवसांपासून बेमुदत आंदोलन सुरु केले आहे. अलिबागमधील जिल्हा सामान्य रुग्णालयासमोर हे आंदोलन सुरु झाले आहे. या आंदोलनात जिल्हा परिषद आरोग्य विभागासह जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या अखत्यारित येणारे आरोग्य कर्मचारी सहभागी झाले आहेत. कर्मचाऱ्यांच्या संपामुळे आरोग्य सेवेवर परिणाम झाले आहे. नियमीत असलेल्या कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण पडला आहे.

रायगड जिल्ह्यात ६१० हून अधिक कर्मचारी राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत आरोग्य विभागात सेवा देत आहेत. या कर्मचाऱ्यांचे शासन सेवेत समायोजन करून घेण्याचा शासन निर्णय •> पान २ वर

### ■ नियमित कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा ताण

**"कर्मचाऱ्यांच्या संपामुळे आरोग्य सेवेवर परिणाम झाला आहे. परंतु रुग्ण व इतर शासनाच्या योजना नागरिकांना उपलब्ध व्हाव्यात यासाठी नियमीत कर्मचाऱ्यांकडून ही कामे करून घेतली जात आहेत.**
**– डॉ. मनिषा विखे,**
**जिल्हा आरोग्य अधिकारी, रायगड"**

**"एनआरएच अंतर्गत काम करणारे कर्मचारी संपावर गेले आहेत. रुग्णांची गैरसोय होऊ नये तसेच शासकीय व प्रशासकीय कामे वेळेत पूर्ण व्हावीत, यासाठी नियमित कर्मचाऱ्यांकडून ही कामे करून घेण्याचा प्रयत्न केला जात आहे. – डॉ. निशीकांत पाटील,**
**जिल्हा शल्यचिकित्सक"**




## गणेशोत्सवादरम्यान मुंबई-गोवा महामार्गावर

# अवजड वाहतुकीला पूर्णतः बंदी

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**गौरी गणपती सणासाठी मोठ्या प्रमाणात चाकरमानी मुंबई गोवा महामार्गावरून प्रवास करतात. सद्यस्थितीत या महामार्गाची दुरावस्था झाली आहे. त्यातच सर्वच चाकरमानी व गणेश भक्तांना वाहतूक कोंडीचा प्रचंड त्रास सहन करावा लागतो.अवजड वाहतुकीमुळे तर कोंडीत अधिकच भर पडते. त्यामुळेच गणेशोत्सव काळामध्ये मुंबई गोवा महामार्गावरील अवजड वाहनांची वाहतूक काही काळासाठी बंद करण्यात येणार आहे. तसेच मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग (क्रमांक ४८) बोरघाट देखील या काळामध्ये अवजड वाहतुकीसाठी बंद राहणार आहे.**



गणेशोत्सवासाठी आगमन, गौरी गणपती विसर्जन, परतीचा प्रवास आदींसाठी सार्वजनिक हितास्तव मुंबई ते गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर वजनक्षमता १६ टन किंवा १६ टनापेक्षा जास्त वाहनांना मोटार वाहन अधिनियम १९८८ च्या कलम १५५ मधील तरतूदीनुसार वाहतूक बंदी करण्यात आली आहे.

गणेशोत्सवाच्या पूर्व तयारीचा प्रवास म्हणून २३ ऑगस्ट रोजी मध्यरात्री १२ वाजेपासून ते २८ ऑगस्ट रोजी रात्री ११ वाजेपर्यंत या कालावधीत जड वाहनांना वाहतूक बंदी असणार आहे. यामध्ये अवजड वाहने, ट्रक, मल्टीएक्सल, ट्रेलर, लॉरी आदी वाहनांचा समावेश आहे.तसेच ५ व ७ दिवसांच्या गणपतीचे विसर्जन, गौरी गणपती विसर्जन आणि परतीच्या प्रवासासाठी ३१ ऑगस्ट आणि २ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजेपासून रात्री ११ वाजेपर्यंत, अनंत चतुर्दशी ११ दिवसांचे गणपती विसर्जन, परतीचा प्रवासाकरिता ६ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजेपासून ते ७ सप्टेंबर २०२५ रोजी रात्री ८ वाजेपर्यंत या कालावधीत जड वाहतूकीस बंदी राहील.

**केव्हा असेल वाहतुकीस परवानगी**

महामार्गावर बंदी असलेल्या कालावधी व्यतिरिक्त उर्वरित कालावधीत ज्यांची वजन क्षमता १६ टन किंवा १६ टनांपेक्षा जास्त आहे, अशा वाहनांना २८ ऑगस्ट रोजी रात्री ११ वाजेपासून ते ३१ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजेपर्यंत, ३१ ऑगस्ट रोजी रात्री ११ वाजेपासून ते २ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजेपर्यंत आणि सप्टेंबर रोजी रात्री ११ वाजेपासून ते ६ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजेपर्यंत वाहतूकीस परवानगी राहील. तसेच सर्व वाहनांना ७ सप्टेंबर रोजी रात्री ८ वाजेनंतर नियमित वाहतुकीस परवानगी असेल.

**या वाहनांना सूट**

मुंबई-गोवा महामार्गावर गणेशोत्सवादरम्यान जड वाहनांना वाहतूक बंदी हे निर्बंध जेएनपीटी बंदर ते जयगड बंदर येथून आयात-निर्यात मालाची वाहतूक करणारी वाहने, दूध, पेट्रोल, डिझेल, स्वयंपाकाचे गॅस सिलेंडर, औषधे, लिक्वीड मेडीकल ऑक्सिजन, अन्न धान्य, भाजीपाला व नाशवंत माल आदी जीवनावश्यक वस्तूंची वाहतूक करणाऱ्या वाहनांना लागू राहणार नाही.. तसेच रस्ता रूंदीकरण, रस्ता दुरूस्ती कामकाज आणि साहित्य, माल ने-आण करणाऱ्या वाहनांनाही ही बंदी लागू राहणार नाही.

यासंदर्भात वाहतूकदारांना संबंधित वाहतूक विभाग, महामार्ग पोलीस यांनी प्रवेशपत्र देण्याची कार्यवाही करावी. कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांचा आणि महामार्गांचा विचार करून पोलीस आयुक्त, नवी मुंबई आणि संबंधीत जिल्ह्यांचे पोलीस अधीक्षक यांनी जड, अवजड वाहनांवरील वाहतुकीचे निर्बंध शिथिल करण्याबाबत प्राप्त परिस्थितीनुसार आपले स्तरावर योग्य तो निर्णय घ्यावा. तसेच जेएनपीटी व जयगड बंदरातून आयात-निर्यात मालाची वाहतूक सुरू राहील, याकरिता वाहतुकीचे नियोजन करण्यात यावे, असे सहसचिव राजेंद्र होळकर यांनी आदेशात नमूद आहे.



## श्रीवर्धन तालुक्याचे आपत्ती व्यवस्थापन सुस्त

**। बोर्लीपंचतन । प्रतिनीधी ।**

श्रीवर्धन तालुक्यात वादळी वाऱ्यासह पावसाने धुमशान सुरु केलं आहे. याचा तडाखा बोर्लीपंचतन पासून दहा किमीवर असलेल्या वेळास-आदगाव रस्त्याला बसला.

वेळास-आदगाव रस्त्यावर दरड कोसळल्याचे बोर्लीपंचतन येथील मंडळ अधिकारी सुनिल पाटील यांना समजताच त्यांनी त्यांचे सहकारी तलाठी चव्हाण यांच्यासह तत्परतेने घटनास्थळी भेट देउन रस्त्यावर विखुरलेल्या छोट्या मोठ्या दगडी हाताने उचलुन बाजुला करुन रस्ता रहदारी साठी मोकळा केला. सदर घटना दुपारी घडल्यानंतर सांयकाळी आठच्या दरम्यान मंडळ अधिकारी यांनी आपल्या सहकार्यासह जाउन मुसळधार पावसामध्ये बारीक सारीक दगड ऊचलुन रस्ता रहदारीसाठी मोकळा केला सूदैवाने या घटनेमुळे कोणताही अपघात झाला नाही. त्यानंतर सकाळी जेसीबीने मोठ्या दगडी हटविण्यात आल्या.पत्रकार उदय कळस व संतोष शिलकर यांनी आपत्ती व्यवस्थापन विभागाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला इतकेच नव्हे तर श्रीवर्धन तहसीलदार यांनाही सदर घटनेचे फोटो आणी मेसेज टाकुन रात्री दहा वाजता माहिती दिली. परंतू त्यांचेकडुन साधी विचारपूस देखील करण्यात आली नाही. गेल्या पाचसहा वर्षापूर्वी पावसाने धुमशान करुन चक्रीवादळाचा तडाखा दिला होता.

# गणेशभक्तांसाठी सजताहेत शाडूच्या मूर्ती

**। रेवदंडा । वार्ताहर ।**

गणेशोत्सवाची लगबग सुरू कारखान्यांत बाप्पा साकारतेय जिवंत कलाकृती गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असून कोकणातील गावोगावी कारखान्यांत गणपती बाप्पाच्या मूर्ती साकारण्याची लगबग शिगेला पोहोचली आहे.

रेवदंडा चौलसह परिसरातील शेकडो कारखान्यांत मूर्तिकार, महिला, तरुणाई अगदी लहान मुलं देखील आनंदाने बाप्पाच्या कामात गुंतलेली दिसत आहेत.

मागील तीन महिन्यांपासून सुरू असलेले काम आता अंतिम टप्प्यात आले असून सुबक मूर्तींना रंग चढवण्याचं व हिरेमोतींच्या सजावटीचं काम दिवसरात्र सुरू आहे. मूर्तिकारांचं लक्ष बाप्पाच्या डोळ्यांवर खिळलेलं असून प्रत्येक मूर्तीमध्ये भक्तीभाव



ओतला जात आहे. वाढती महागाई, पण उत्साहात कसलीच कमी नाही यंदा महागाईमुळे मूर्तींच्या किंमती वाढल्या आहेत. शाडूच्या मातीच्या दरात दहा टक्के वाढ झाली असून रंगसाहित्य, सजावटीचे साहित्य आणि मजुरीच्या खर्चामुळे कारखानदारांपुढे आव्हान उभं राहिलं आहे. तरीदेखील भक्तांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी मूर्तिकार झटत आहेत.मजूर मिळण्यात अडचणी, विजेचा लपंडाव असूनही कारखानदार दिवसरात्र काम करून वेळेत मूर्ती भक्तांच्या हाती पोहोचवण्याचा प्रयत्न करत आहेत.पर्यावरणपूरक बाप्पा

रेवदंडा, चौल आदी गावांमध्ये तयार होणाऱ्या बहुतांश मूर्ती या शाडूच्या मातीच्या असतात. त्यामुळे विसर्जनावेळी पर्यावरणाला धोका पोहोचत नाही. मूर्ती पूर्णपणे विरघळून जाते, ही विशेष बाब भक्तांच्या समाधानात भर घालते. चाकरमान्यांची ओढ गणेशभक्तांचा आनंदोत्सव कोकणात गणेशोत्सवाला वेगळंच महत्त्व आहे.

## पेण-मांडवा एसटीची फेरी बंदच

**पोयनाड :** पेण-मांडवा एसटी मागील वर्षभरापासून बंद असल्याने प्रवाशांचे मोठे हाल होत आहेत. ही एसटी एमआयडीसीमार्गे थेट पोयनाड येथे जात असल्याने प्रवाशांचा फायदा होत होता. आता मात्र या प्रवाशांना कार्लेखिंडमार्गे दुसरी एसटी पकडून पोयनाड किंवा पेण गाठावे लागते. या पार्श्वभूमीवर पेण-मांडवा व ठाणे-मांडवा या तीनही एसटी बस सुरू कराव्यात, अशी मागणी प्रवासी करीत आहेत.अलिबाग तालुक्यातील हाशिवरे, नारंगी, पेढांबे, सारळ, शिरवली या भागातून अलिबागला जाण्यासाठी सातत्याने एसटी असतात. येथून पोयनाड, पेण, पनवेल, वडखळ येथे जाणाऱ्या प्रवाशांसह विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे.

## अलिबागमध्ये शाडू मातीच्या गणेशमूर्तींना मागणी

## पर्यावरणपूरक गणेशोत्सवाकडे गणेशभक्तांचा कल

**। रायगड । प्रतिनिधी ।**

गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असून, पर्यावरणपूरक गणेशोत्सवाकडे गणेशभक्तांचा कल वाढत असल्याचे दिसून येते. गणेशभक्तांमध्ये हळूहळू पर्यावरणविषयक जागृती होत असून, शाडूच्या मातीपासून तयार केलेल्या गणेशमूर्तींच्या मागणीत वाढ होत आहे. यावर्षी जिल्ह्यातील जवळपास ४० ते ५० टक्के गणेशभक्तांनी पर्यावरणपूरक मूर्तींची मागणी कारखानदारांकडे केली आहे.

गणेशोत्सव जवळ येताच मूर्ती कारखान्यांमध्ये गणेशमूर्ती तयार करण्याची लगबग सुरू झाली आहे. कच्च्या गणेशमूर्ती तयार करण्यात आल्या असून, मूर्तींची रंगरंगोटी करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. गणेशभक्तांची पावले मूर्ती कारखान्यांकडे वळू लागली असून, आपल्याला हव्या असलेल्या गणेशमूर्तींची आगाऊ नोंदणी भक्त करीत असल्याचे चित्र दिसून येते.मागील काही वर्षांपासून अलिबागमध्ये पर्यावरणपूरक गणेशमूर्तींना मागणी वाढली आहे. त्यामुळे अनेक गणेशमूर्ती कारखान्यांमध्ये शाडू माती, कागदी लगदा आणि इतर नैसर्गिक सामग्रींपासून बनवलेल्या गणेशमूर्ती बनविण्यात येतात. आता गणेशोत्सव जवळ आल्याने मूर्तीला रंगरंगोटी करण्याचे काम कारखान्यांमध्ये सुरू आहे. पीओपीच्या मूर्ती पाण्यात विरघळत नसल्याने जलप्रदूषण होते. शाडू माती आणि कागदी लगद्याच्या मूर्ती पर्यावरणास अनुकूल आहेत. या मूर्ती नैसर्गिक सामग्रीतून बनवल्या जातात, जसे की शाडू माती, कागदी लगदा, रंग आणि इतर नैसर्गिक घटक. पर्यावरणपूरक मूर्तीदेखील आकर्षक आणि कलात्मकरित्या बनविण्यात येत आहेत. त्यामुळे गणेशभक्तांच्याही पसंतीस अशा मूर्ती उतरत आहेत. अनेक गणेशभक्त आपल्या पसंतीप्रमाणे आधीच सांगून गणेशमूर्ती तयार करून घेत आहेत. नागरिकांमध्येही पर्यावरण संरक्षणाबद्दल जागरूकता वाढत असल्यामुळे, ते पर्यावरणपूरक पर्याय निवडणे पसंत करतात.

सध्या शाडू मातीच्या सव्वा ते दीड फुटांच्या मूर्ती अडीच ते तीन हजार रुपये, तर पीओपीच्या मूर्ती दोन हजार रुपयांपर्यंत विक्री केल्या जात आहेत.

पान १ वरुन

## मासेमारी संकटात

मिडल ईस्ट या जगातील विविध भागात पोहचली आहे. १५ ऑगस्ट २०२४ पासून रायगड जिल्ह्यातील या प्रमुख बंदरातून मासळी विक्री सुरू झाली आहे. पहिल्या दोन महिन्यांच्या कालावधीत या बंदरातून ८० कोटींच्या ८०० टन मासळीची निर्यात झाली होती. आता हा आकडा ८०० कोटींच्या पार गेला असल्याची माहिती निर्यातदारांनी दिली आहे. ही मासळी अमेरिका, चीन, थायलंड तसेच आशिया व युरोप खंडातील अनेक देशांत निर्यात करण्यात येत आहे. तर दुसरीकडे मासळी बंदर आणि त्यावर आधारित विविध प्रकल्पांमुळे रायगड जिल्ह्यातील विविध प्रकारच्या छोट्या-मोठ्या लघुउद्योगांत वाढ झाली आहे. त्यामुळे बंदरातील सुमारे ५ हजार मासेमारी बोटी व त्यावर आधारित १० हजार कुटुंबांना लाभ झाला आहे.

## सरकारी वकिलाने कोर्टातच संपवल जीवन

या संपूर्ण आत्महत्या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशी मागणी मृत सरकारी वकील चंदेल यांच्या कुटुंबीयांनी केली. दरम्यान, वडवणी पोलिसांनीही चिठ्ठी मिळाल्याचा दुजोरा दिला आहे. मात्र, चिठ्ठीसंदर्भात आत्ताच माहिती देता येणार नाही, असे म्हटल्याने चंदेल यांच्या मृत्यूचे गूढ आणखी वाढले आहे. चंदेल हे स्वभावाने अतिशय चांगले आणि मनमिळाऊ होते. ते असे काही करणार नाहीत. त्यांच्यावर कुणाचा तरी दबाव होता असे त्यांच्या बोलण्यावरून वाटत होते. त्यामुळे सरकारकडून याप्रकरणाची सीआयडी चौकशी करण्यात यावी. तसेच, त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत करण्यात यावी, अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे. याबाबत जिल्हाधिकारी यांना भेटून गावकरी निवेदनही देणार आहेत.

## विद्यार्थ्यांसाठी एसटी सेवा सुरळीत करा

प्रवाशाची मोठी गैरसोय होत आहे. रोहा परिसरातील नागरिकांच्या अडचणी लक्षात घेऊन तातडीने कुर्डुस मार्गे रोहा येथे एसटी बस सेवा सुरू करावी,अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. तसेच आक्षी मार्गे जाणाऱ्या बसेसही बेली पूल धोकादायक असल्याने बंद करण्यात आल्या आहेत त्यांनाही पर्याय मिळावा, अशी मागणी करण्यात आली आहे. सहाण-पाल्हे पुलावरून रेवदंडयाकडे जाणाऱ्या एसटी बसेस आक्षी येथे देखील नेण्यात येण्यात याव्यात, जेणेकरून विद्यार्थी, प्रवासी व महिला, ज्येष्ठ नागरिकांचा वाहतूकीचा प्रश्न सुटण्यास मदत होईल, असेही ॲड. मानसी म्हात्रे यांनी सांगितले.

## आम्हाला तुमचाही पाठिंबा हवा

राधाकृष्णन यांना पाठिंबा मागण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवार आणि उद्धव ठाकरे दोघांनाही फोन केला होता. उपराष्ट्रपतीपदाचे एनडीएचे उमेदवार राज्यपाल राधाकृष्णन हे महाराष्ट्रातील मतदार असल्याने त्यांना पाठिंबा द्यावा, अशी विनंती फडणवीसांनी दोन्ही नेत्यांकडे केल्याची सूत्रांची माहिती आहे. उपराष्ट्रपतीपदासाठीच्या निवडणुकीत आम्हाला तुमचाही पाठिंबा हवाय, असे म्हणत मुख्यमंत्र्यांनी विरोधी पक्षातील प्रमुख नेत्यांना फोन केला. मात्र, काँग्रेस प्रदेशाध्यक्षांना फोन केल्याचे कुठलेही वृत्त नाही. त्यामुळे, फडणवीसांनी ठाकरे आणि पवारांना फोन करुन पाठिंबा मागितला आहे.

उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर मोठी जबाबदारी देण्यात आली आहे. महाराष्ट्रातील सर्वपक्षीय नेत्यांशी देवेंद्र फडणवीस संवाद साधत आहेत. उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी फडणवीस मविआतील वरिष्ठ नेत्यांशी चर्चा करत आहेत. एनडीएच्या उमेदवाराला पाठिंबा देण्याबाबत ही चर्चा होत असून याबाबतची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे, त्याचाच एक भाग म्हणून फडणवीसांनी ठाकरे-पवारांना फोन केले. खासदार संजय राऊत यांनीही यास दुजोरा दिला आहे.

## केरळमध्ये शाळेबाहेर सापडली स्फोटके

गेटजवळ स्फोटके पाहिली. उत्सुकतेने, मुलाने एक स्फोटक जमिनीवर फेकले. ज्याचा मोठा आवाज झाला. त्यात तो आणि जवळच उभ्या असलेल्या ८४ वर्षीय लीला जखमी झाले. शाळेचे अधिकारी आणि रहिवासी घटनास्थळी धावले आणि पोलिसांना बोलावले. ज्यांनी घटनास्थळाची तपासणी केली आणि एका बादलीत आणखी चार स्फोटके आढळली.

जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर आहे, असे पोलीस सूत्रांनी सांगितले. पलक्कड उत्तर पोलिसांनी स्फोटक पदार्थ कायद्याच्या कलम ३(अ) (जीवनाला धोका निर्माण करणारा स्फोट), ४(अ) (जीवन आणि मालमत्तेला धोका निर्माण करण्याच्या उद्देशाने स्फोटके बाळगणे) आणि बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) कायद्याच्या कलम ७५ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे, जो मुलांवरील क्रूरतेशी संबंधित आहे.

या प्रकरणातील एफआयआरमध्ये असे म्हटले आहे की, स्फोटके धोकादायक स्वरूपाची होती आणि मानवी जीव धोक्यात घालण्यासाठी त्या ठिकाणी ठेवण्यात आली होती. डीएसपी दर्जाच्या अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखालील एक पथक या प्रकरणाचा तपास करत आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तपासाचा एक भाग म्हणून, परिसरात बसवलेले सीसीटीव्ही कॅमेरे जप्त करण्यात आले आहेत आणि शाळेच्या परिसरात स्फोटके पेरणाऱ्या लोकांची ओळख पटवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. भाजप जिल्हा नेत्यांनी या घटनेमागे मोठे कट असल्याचा आरोप केला आणि सखोल चौकशीची मागणी केली. माकप नेत्यांनी आरोप केला की शाळा व्यवस्थापन आरएसएसशी संबंधित आहे आणि स्वयंसेवकांना परिसरात प्रशिक्षण दिले जाते. काँग्रेसनेही या घटनेची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे.

## सिंहगडावरुन युवक कोसळला

आला होता. बुधवारी (दि.२०) दुपारी ४.३० वाजता ते सिंहगडावर आले असता, या वेळेस सायंकाळच्या सुमारास तानाजी कड्याजवळ येऊन ते पर्यटनाचा आनंद घेत होते. त्यावेळी, गौतमने जवळच जातो, असे मित्रांना सांगितले. मात्र, बऱ्याच वेळानंतरही तो परत आला नाही. त्यामुळे मित्रांनी गौतमचा शोध घेतला असता तो कुठेही आढळून आला नाही. जवळच हवा पॉइंटशेजारी त्याची चप्पल सापडली, मात्र तो दिसला नाही. सिंहगड भागात मुसळधार पाऊस असून, वाऱ्याचा वेगही जास्त आहे. वाऱ्याचा व जमिनीचा अंदाज न आल्याने गौतम खोल दरीत कोसळला असावा असा अंदाज त्याच्या मित्रांकडून लावला गेल्याने गौतमचा शोध घेतला जात आहे.

आपत्ती व्यवस्थापन, ग्रामीण पोलीस कर्मचारी व स्थानिक गिर्यारोहक कार्यकर्ते या तरुणाचा रात्री उशिरापर्यंत शोध घेत होते. जवळपास एक हजार फुटापर्यंत खोल दरीत उतरून आपत्ती व्यवस्थापन पथकाने शोध घेण्याचा प्रयत्न केला. खोल दरीत जाऊन मुसळधार पाऊस, वाऱ्यात बेपत्ता गौतमचा शोध घेतला. मात्र रात्रीच्या अंधारात तो आढळून न आल्याने रात्री ११ वाजता शोधकार्य थांबवले. त्यानंतर, गुरुवारी सकाळी ६ वाजता पुन्हा शोधकार्य सुरू करण्यात आले आहे.

## शाळेत विद्यार्थ्याचा खून

स्कूल नावाची शाळा आहे. या शाळेत मंगळवारी सकाळी नववी आणि दहावीच्या वर्गात शिकणाऱ्या दोन विद्यार्थ्यांत बाचाबाची झाली. मात्र नववीच्या विद्यार्थ्याने दहावीच्या विद्यार्थ्यावर चाकूने हल्ला केला. यात तो गंभीर जखमी झाला. त्याला मणिनगर येथील एका खासगी रुग्णालयात नेले असता काल रात्री उशिरा उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

या घटनेमुळे संतापलेल्या नागरिकांनी आज सकाळी शाळेकडे धाव घेतली आणि गोंधळ सुरू केला. शाळेची तोडफोड केली आणि कर्मचाऱ्यांना मारहाण केली. या प्रकाराची माहिती कळताच पोलिस घटनास्थळी धाव घेतली आणि त्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी लाठीमार केला. जमावाने शाळेची बस, मोटार आणि दुचाकी वाहनांची मोडतोड केली. जमावाने तर एका कर्मचाऱ्याची कॉलर पकडून इमारतीत ओढत नेले.

मुख्याध्यापक आणि अन्य कर्मचाऱ्यांना देखील मारहाण केली. शाळेचे दरवाजे आणि खिडक्यांची मोडतोड केली. स्थिती एवढी चिघळली की, पोलिसांनी कर्मचाऱ्यांना वाचविण्याचा प्रयत्न केला तरी जमावाकडून मारहाण केली जात होती. एवढेच नाही तर जमावाने पोलिसांचे वाहनही उलथून टाकण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर रास्ता रोको आंदोलन केले. तणाव झाल्याने मणिनगरचे आमदार, पोलीस अधीक्षक, उपअधीक्षकांनी शाळेत धाव घेतली. बजरंग दल, विश्व हिंदू परिषद, अभाविपचे सदस्यही शाळेत गेले आणि त्यांनी घोषणाबाजी केल्याने वातावरण तापले.

## कर्मचाऱ्यांच्या संपामुळे आरोग्य सेवा ठप्प

काढण्यात आला आहे. मात्र शासन दरबारी आवाज उठवूनही त्या निर्णयाची अंमलबजावणी आणि अन्य मागण्या मान्य करण्यात आल्या नाही. त्यामुळे या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मंगळवार (दि.१९) पासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेतला.

सुरुवातीला रायगड जिल्हापरिषद कार्यालयासमोर आंदोलने करण्यात आली. त्यानंतर जिल्हा सामान्य रुग्णालयासमोर ठिय्या आंदोलन सुरु केले आहे. गेल्या दोन दिवसांपासून हे कर्मचारी बेमुदत संपावर गेले आहेत. या संपाचा परिणाम आरोग्य सेवेवर होत असल्याचे चित्र आहे. वेगवेगळ्या आरोग्य सुविधा उपलब्ध करताना आरोग्य विभागाला तारेवरची कसरत करावी लागत आहे. कर्मचारी संपावर गेल्याने नियमीत कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण पडला आहे. त्यामुळे नियमीत आरोग्य सेवेवर त्याचा परिणाम होत आहे. संघटनेच्या म्हणण्यानुसार, नियमितीकरणाबरोबरच मानधन वाढ, लॉयल्टी बोनस, भविष्यनिर्वाह निधी, विमा सुविधा, तसेच बदली धोरण यांसारख्या महत्त्वाच्या मागण्या प्रलंबित आहेत. या संदर्भात आरोग्यमंत्री यांनी ८ व १० जुलै २०२५ रोजी शिष्टमंडळाला सकारात्मक आश्वासन दिले होते. तथापि, प्रत्यक्षात कोणतीही ठोस कारवाई झाली नाही. अखेर कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचा निर्णय घेतला आहे. या आंदोलनादरम्यान सर्व आरोग्यसेवा मोठ्या प्रमाणात प्रभावित होणार आहेत. ब्लड बँक, लसीकरण सत्रे तसेच विविध ऑनलाईन व ऑफलाईन अहवाल तयार करण्याची कामे पूर्णपणे बंद राहिली आहे. आरोग्य अभियानातील कर्मचारी अनेक वर्षे अल्प मानधनावर कार्यरत असून, ग्रामीण व शहरी भागात आरोग्यसेवा सुरळीत ठेवण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. त्यामुळे त्यांच्या आंदोलनामुळे सर्वसामान्य रुग्णांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे. कर्मचाऱ्यांचे स्पष्ट मत आहे की, शासन निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करून सर्व मागण्या मान्य झाल्याशिवाय आंदोलन मागे घेण्यात येणार नाही. त्यामुळे आता सरकारकडून कोणती पावले उचलली जातात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



## आंबेपुर येथे संतसेना महाराज पुण्यतिथी साजरी

**। रेवदंडा । वार्ताहर ।**

येथील चौल, नागाव, आक्षी, आंबेपुर नाभिक समाजाचे वतीने आंबेपुर येथील नाभिक समाज सभागृहात संतसेना महाराज पुण्यतिथी उत्साहात साजरी करण्यात आली.

अलिबाग तालुक्यातील आंबेपुर येथील नाभिक समाज सभागृहात बुधवारी (दि.१९) चौल, नागाव, आक्षी, आंबेपुर नाभिक समाजाचे वतीने आयोजीत संतसेना पुण्यतिथी या कार्यक्रमास अलिबाग शहर, चौंढी-किहीम विभाग, पोयनाड विभाग, चौल-रेवदंडा विभाग, नाभिक समाज बांधव व भगिनीची उपस्थिती होती. या निमित्ताने सकाळी ९ ते ११ संतसेना महाराज पूजा व आरती, ११.३० ते १.०० वाजेपर्यंत पोथी वाचन, दुपारी १.३० ते ४ वाजेपर्यंत महाप्रसाद आदी कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले होते.

यावेळी चौल, नागाव, आक्षी, आंबेपुर नाभिक समाजाचे वतीने आंबेपुर येथील नाभिक समाज सभागृहात विजय नामदेव भोसले, विक्रांत घाडगे, सचीन आम्रे, महेश चव्हाण, समीर पवार, मनोज कदम, हारेश कदम, अशोक पवार,प्रविण मोरे, महेश घाडगे, विशाल भोसले, राकेश मोरे, विजय लाड, गणेश भोसले,राजू लाड,अनंता क्षिरसागर,विजय मोरे, मनोहर पवार,प्रणित आपटकर, विनायक पाटील व सर्व महिला कमिटी सदस्य उपस्थित होते.

## पनवेल येथे उद्योग सुसंवादाचे आयोजन

**। रायगड । प्रतिनिधी ।**

आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे जिल्हा उद्योग केंद्र रायगड व लघु उद्योग भारती, रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्ह्यातील सर्व उद्योजकांसाठी जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या उपस्थितीत उद्योग सुसंवाद-२०२५ या कार्यक्रमाचे सकाळी ११.०० वा आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमास जिल्ह्यातील सर्व शासकीय यंत्रणा, उद्योजक यांनी उपस्थितीत राहावे, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी.एस.हरळया यांनी केले आहे.

या कार्यक्रमास जिल्हा पोलीस अधिक्षक आचल दलाल, मुख्य कार्यकारी अधिकारी, नेहा भोसले आयुक्त, पनवेल महानगर पालिका, मंगेश चितळे व जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी.एस.हरळया, जिल्ह्यातील सुमारे ४०० उद्योजक उपस्थितीत राहणार आहेत. शनिवार, दि.२३ ऑगस्ट रोजी पनवेल औद्योगिक सहकारी वसाहत मर्या.पनवेल येथे हरित महाराष्ट्र, समृध्द महाराष्ट्र वृक्ष लागवड अभियानांतर्गत वृक्षारोपणाचा कार्यक्रम होणार आहे.

## निवडक



### चोंढी हायस्कूलचे युवा महोत्सवात यश

**अलिबाग :** मुंबई विद्यापिठाच्या विद्यार्थी विकास विभागामार्फत सोमवारी (दि.१८) युवा महोत्सव मूरूडमध्ये पार पडला. या महोत्सवात महोत्सवात अलिबाग तालुक्यातील चोंढी-किहीम येथील लोकमान्य शिक्षण प्रसारक मंडळाच्या महाविद्यालयाने घवघवीत यश संपादन केले. विविध सांस्कृतिक, कलात्मक आणि बौद्धिक स्पर्धांमध्ये सहभाग घेत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आपली प्रतिभा सिद्ध केली आहे.या युवा महोत्सवात नाट्य, गीतगायन, वाद्यवादन, लोकनृत्य, वक्तृत्व, कथाकथन आणि रांगोळी स्पर्धांमध्ये महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ठ कामगिरी केली. यामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पारंपरिक नृत्य स्पर्धा आणि प्रहसन (मराठी स्किट) स्पर्धेत प्रथम क्रमांक तसेच सुरक्षा थळे हिने नाट्यस्पर्धेत, भूषण मालवी याने नाट्य संगीत व भारतीय सुगम संगीत या गायन स्पर्धेत व आकाश पाटील याने तालवाद्य या स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळवले आहे. तसेच, हुमेरा शेख हिने कथाकथन स्पर्धेत तृतीय क्रमांक व रिया कदम हिने रांगोळी स्पर्धेत उत्तेजनार्त पारितोषिक मिळविले आहे. या यशामागे एल.एस.पी.एम महाविद्यालयाचे अध्यक्ष रवींद्र (काका) ठाकूर, उपाध्यक्ष प्रमोद पाटील, कार्यवाह राजेंद्र ठाकूर, सहकार्यवाह जगन्नाथ पेडवी, खजिनदार राजेंद्र शिंदे, कायम सदस्य अ‍ॅड. प्रवीण ठाकूर तसेच महाविद्यालय विकास समिती सदस्य राजन नार्वेकर, सुनील थळे, मनोहर म्हात्रे, तसेच सर्व संचालक मंडळ, प्राचार्या लीना पाटील यांचे मार्गदर्शन व मोलाचे सहकार्य लाभले. या युवा महोत्सवात सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. प्रवेश पाटील यांचे नेतृत्व मोलाचे ठरले.

### कळंबोलीत पालिकेचे उत्तम व्यवस्थापन

**पनवेल :** मागील काही दिवस सुरु असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक भागांत पाणी साचण्याच्या घटना घडत आहेत. मात्र, पावसाळ्यात पाणी तुंबण्याकरिता कुप्रसिद्ध असलेली कळंबोली वसाहत मात्र याला अपवाद ठरली आहे. पाण्याचा निचरा होण्यासाठी पनवेल पालिकेच्यावतीने करण्यात आलेल्या योग्य नियोजनामुळे हे शक्य झाले असून, रहिवाशांना दिलासा मिळाला आहे. समुद्र सपाटीपासून जवळपास साडेतीन मीटर खाली वसवण्यात आलेल्या कळंबोली वसाहतीत दर वर्षी पाणी साचण्याच्या घटना घडत होत्या. याच कारणाने २००५ साली आलेल्या महापुरात वसाहतीमधील घरांचे मोठे नुकसान झाले होते. मात्र, त्या नंतरही कळंबोली वसाहत वसवणाऱ्या सिडको प्रशासनाकडून वसाहतीला पुरापासून वाचवण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या उपाय योजना न राबवल्याने पाणी साचण्याचे प्रकार घडतच होते. २०१६ साली पालिकेच्या स्थापनेनंतर कळंबोली वसाहतीचा समावेश पालिकेत करण्यात आल्यावर मागील वर्षापर्यंत पाणी तुंबण्याचे प्रकार घडतच होते. यापासून धडा घेत योग्य यंत्रणाचा वापर करत पालिकेच्या आपत्कालीन विभागाकडून करण्यात आलेल्या नियोजनामुळे मुसळधार पावसानंतरीही कळंबोली वसाहतीमधील जनजीवन सुरळीत होते.

# समृद्धीला प्राधान्य, कोकणाला दुजाभाव

**मुंबई-गोवा महामार्ग शासनाच्या उदासीनतेचे जिवंत उदाहरण**

**राज्यकर्त्यांकडून फक्त आश्वासनांचे डोंगर**

**| माणगाव | प्रतिनिधी |**

मुंबई-गोवा महामार्गाचे काम हे उद्यापही पुर्णत्वास न गेल्याने हे सरकारचे सर्वात मोठे अपयश ठरले आहे, असे स्पष्टपणे सांगावे लागत आहे. सतरा वर्षे उलटूनही हा महामार्ग पूर्ण झालेला नाही, हे केवळ शासनाच्या आणि राज्यकर्त्यांच्या निष्क्रियतेचे, उदासीनतेचे आणि दुजाभावाचे जिवंत उदाहरण आहे. नुकतेच सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी या महामार्गाची पाहणी केली. त्यानंतर कागदोपत्री हालचाली सुरू झाल्या. परंतु; प्रत्यक्षात कामाचा वेग अद्यापही तोकडाच आहे. गणेशोत्सव उंबरठ्यावर असताना माणगाव व इंदापूर शहरातील अपूर्ण वाह्यवळण रस्त्यांमुळे वाहतूक कोंडी टळणार नसल्याचे चित्र स्पष्ट आहे. १७ वर्षाच्या प्रवासानंतरही राज्यकर्त्यांनी महामार्गावर आश्वासनाचे डोंगरच दाखवले आहेत. त्यामुळे कोकणवासीयांसह प्रवासी, पर्यटक व स्थानिक नागरिकात प्रचंड प्रमाणात चिड निर्माण होत आहे.

गणेशोत्सव काळात लाखो गणेशभक्त मुंबई-गोवा महामार्गाचा वापर करून कोकणात जात असतात. त्यांना वारंवार महामार्गावरील खड्ड्यांना अन् तासन् तास लागणाऱ्या कोंडीला सामोरे जावे लागते. परंतु, याबद्दल सरकारला कसलीच खंत नाही. विदर्भात जाणारा समृद्धी महामार्ग हा प्रकल्प राज्यकर्त्यांनी महत्त्वाकांक्षी प्रकल्प म्हणून गाजवला. मुंबई-गोवा महामार्गानंतर सुरू केलेल्या या मार्गाचे जलदगतीने कामे पूर्ण झाली, उद्घाटन सोहळे झाले, प्रवासासाठी खुला करण्यात आला, तसेच श्रेय देखील लाटले गेले. परंतु, मुंबई-गोवा महामार्ग अद्यापही अपुर्णावस्थेत आहे. त्यामुळे हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प नाही का? कोकणातील जनतेचे प्रश्न, त्यांचे जीव, त्यांचा प्रवास याला काहीही किंमत नाही का? राज्यकर्त्यांनी दाखवलेला दुजाभाव आहे, असा आरोप कोकणवासीयांकडून केला जात आहे.

शासन आणि संबंधित विभागांनी हा महामार्ग वर्षानुवर्षे रखडवत ठेवल्यामुळे प्रवाशांचा प्रवास त्रासदायक झाला असून अपघातांची संख्या देखील प्रचंड वाढली आहे. तर, व्यावसायिकांनाही मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहेत. राज्यकर्त्यांनी कोकणवासीयांना हलक्यात घेऊ नये, त्यांच्या उद्रेकाची शासनानी वाट पाहू नये, अशी प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत. इतक्या वर्षांचा विलंब, अपूर्ण बाह्यवळन रस्ते आणि खराब नियोजनामुळे कोकणातील जनतेच्या भावना वारंवार दुखावल्या जात आहेत. शासनाने तात्काळ गांभीर्याने लक्ष घालून हा महामार्ग पूर्णत्वास नेणे गरजेचे आहे. अन्यथा प्रत्येक गणेशोत्सव आणि हंगामी सुट्टीत याच त्रासदायक चित्राची पुनरावृत्ती होत राहील. त्यामुळे या महामार्गाचे काम तातडीने पूर्ण करणे हीच खरी सत्ताधाऱ्यांची जबाबदारी आहे. परंतु, हेच सत्ताधारी सध्या आपसातील अंतर्गत वादात गुरफटले गेले आहेत. त्यामुळे त्यांना या माहामार्गाकडे लक्ष देण्यासाठी वेळ काढता येत नाही. त्यांना प्रवाशांच्या जिवापेक्षा राजकारण महत्वाचे वाटत आहे, अशा संतप्त प्रतिक्रिया कोकणवासीयांकडून उमटत आहेत.



**चाकरमान्यांची जीवघेणी धडपड**

**आज महामार्गावर अनेक ठिकाणी कामे अपूर्ण आहेत. खड्डे एवढे वाढले आहेत की, त्यातून प्रवास करत आपल्या गावी जाणे ही चाकरमान्यांसाठी जीवघेणी धडपड ठरत आहे. तात्काळ खड्डे भरण्याऐवजी ठेकेदार आणि विभाग एकमेकांवर जबाबदारी ढकलत बसले आहेत. ही स्थिती म्हणजे शासनाच्या उदासीनतेचा कळसच म्हणावा लागेल. कोकणातील गणेशोत्सव हा केवळ धार्मिक नाही तर सांस्कृतिक आणि भावनिक बंधांनी जोडलेला उत्सव आहे. या काळात लाखो भाविक आपल्या गावी जातात. परंतु, प्रत्येक वेळी त्यांना अपूर्ण महामार्गामुळे प्रचंड यातना भोगाव्या लागत आहेत.**

## जेएसडब्ल्यूच्या प्रकल्प विस्ताराला विरोध

**शेकापचे अनिल पाटील करणार पोलखोल**

**| रायगड | प्रतिनिधी |**

जिंदाल स्टील लिमिटेडचा १० ते १५ एमटीपीए इतका प्रकल्पविस्तार (फेज-३) म्हणजे रायगडच्या पर्यावरणावर आणखी एक घाला असल्याचा आरोप स्थानिक शेतकरी व नागरिकांनी केला आहे. २२ ऑगस्टला होणाऱ्या जनसुनावणीत या विस्ताराला ठाम विरोध नोंदवला जाणार असून, त्याबाबत ग्रामस्थांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे लेखी हरकत सादर केली आहे.

यादरम्यान, ग्रामस्थांनी देखील जेएसडब्लू कंपनीवर आक्रमक आरोप केले आहेत. पहाटे दुर्गंधीयुक्त वायूचा त्रास होतो. तसेच, हवेतील लोखंडी कणांनी नागरिकांच्या फुफ्फुसांचे आजार बळकावत चालले आहेत. कामगार व ग्रामस्थांवर श्वसनविकारांचा प्रकोप होत असून तपासण्या व फिरत्या दवाखान्यांची सेवा देखील कंपनीकडून दिली जात नाही. कंपनीमुळे खाडी व उपखाड्या प्रदूषित झाल्या असून शेती, मत्स्यसंपदा आणि इकोसिस्टीम उद्ध्वस्त होत आहे. कंपनीत माल घेऊन येणाऱ्या जहाजांच्या लाटांमुळे बांध फुटून खारं पाणी शेतात व गावात शिरत आहे. त्यावर कंपनी ठोस उपाय करत नाही. कंपनीच्या उत्पादनवाढीबरोबर कार्बन क्रेडिट योजना व उपाययोजना लपवण्यात येत आहेत, असे अनेक आरोप स्थानिकांनी केले आहेत. शेतकरी संघर्ष समितीचे सचिव व शेकापचे जिल्हा पदाधिकारी अनिल पाटील यांनी संतप्त भाषेत जेएसडब्लू कंपनीवर हल्ला चढवला आहे. ते म्हणाले की, कंपनीचा विस्तार म्हणजे नोकऱ्यांच्या नावाखाली नागरिकांना प्रत्यक्ष मृत्यूची भेट आहेच. त्यामुळे जनतेला फसवून, माहिती लपवून, प्रदूषणाचे राक्षसी कारखाने उभे करू देणार नाही. अन्यथा आम्हाला केंद्रीय पर्यावरण अपिल प्राधिकरणाची दारे ठोठावावी लागतील, असा स्पष्ट इशारा अनिल पाटील यांनी दिला.

## सिव्हीलमधील सिटीस्कॅन मशीनमध्ये बिघाड

**| अलिबाग | प्रतिनिधी |**



अलिबागमधील जिल्हा सामान्य रुग्णालयातील सिटीस्कॅन मशीन गेल्या चार दिवसांपासून बंद आहे. या मशीनमध्ये बिघाड झाला असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे रुग्णांची सिटीस्कॅन करताना अडचणी निर्माण होत आहेत.

अलिबाग हे जिल्ह्याचे ठिकाण आहे. गेल्या ४० वर्षापासून जिल्हा रुग्णालयाची इमारत उभी आहे. अपघातग्रस्त व इतर रुग्णांचे सिटीस्कॅन करण्यासाठी पुर्वी पनवेल व अन्य खासगी ठिकाणी जावे लागत होते. रुग्णांना आर्थिक भुर्दंड बसत होता. त्यामुळे जिल्हा सामान्य रुग्णालयात अद्ययावत अशी सिटीस्कॅन मशीन आणण्यात आली. या मशीनद्वारे अपघात रुग्णांसह इतर रुग्णांची सिटीस्कॅन करण्याचे काम केले जाते. 'क्ष' किरण विभागात ही मशीन कार्यरत आहे. दिवसाला तीसहून अधिक रुग्णांचे सिटीस्कॅन करून त्यांच्या आजाराचे निदान करण्याचे काम केले जाते. परंतु, गेल्या चार दिवसांपासून ही मशीनच बंद पडली आहे. मशीनच्या इंजिनमध्ये बिघाड झाला आहे. नवीन पार्ट बसविल्यावर हे मशीन चालू होण्याची शक्यता आहे. एका कंपनीला हे काम देण्यात आले आहे. परंतु, अजूनर्यंत दूरुस्ती करण्यात आली नाही. त्यामुळे रुग्णांची गैरसोय होत असल्याचे चित्र आहे.

> **सिटीस्कॅन मशीनमध्ये बिघाड झाल्यामुळे गेल्या काही दिवसांपासून ही मशीन बंद आहे. दुरुस्तीचे काम एका एजन्सीला दिले आहे. मशीनमध्ये नवीन पार्ट बसविण्याचे काम केले जाणार आहे. लवकरच मशीन सुरु होईल.**
> **- डॉ. निशीकांत पाटील, जिल्हा शल्यचिकित्सक, अलिबाग**

### बेपत्ता खलाशाचा मृतदेह सापडला

**| चिरनेर-उरण | प्रतिनिधी |**

वादळी वाऱ्यामुळे गुजराती भरतभाई कचराभाई डरी यांच्या मालकीची 'भवानी गंगा' नावाची मच्छीमार बोट १९ ऑगस्ट रोजी मोरा बंदरात आश्रयासाठी होती. परंतु, त्यावेळी एक खलाशी बेपत्ता झाला होता. भरतभाई डालकी (४४) असे या बेपत्ता खलाशाचे नाव आहे. पोलिसांनी राबबिलेल्या शोध मोहिमेनंतर अखेर गुरूवारी (दि.२१) त्यांचा मृतदेह सापडला असल्याची माहिती मोरा पोलिसांनी दिली आहे.

## जीव धोक्यात घालून वीजपुरवठा पूर्ववत

**| सुधागड-पाली | प्रतिनिधी |**

सुधगड-पाली परिसरात अतिवृष्टीमुळे खंडित झालेला वीजपुरवठा महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी जीव धोक्यात घालून पुन्हा सुरू केला आहे. ट्यूब-बोटीच्या साहाय्याने पाण्यात उतरून त्यांनी दुरुस्ती केली आणि अखेर परिसरात वीजपुरवठा पूर्ववत करण्यात यश मिळाले आहे.

पाली परिसराचा वीजपुरवठा अतिवृष्टीमुळे खंडित झाला होता. पहाटे अडीच वाजता कानसई ईएचव्ही उपकेंद्रातून येणारा टेंभी इनकमर ट्रिप झाल्याने उपकेंद्रावरील वीजपुरवठा पूर्णपणे खंडित झाला. घटनेनंतर महावितरण कर्मचाऱ्यांनी तात्काळ लाईन पॅट्रोलिंगचा प्रयत्न केला. मात्र, अंबा नदीवरून मोठ्या प्रमाणात पाण्याचा प्रवाह असल्याने दुरुस्ती विलंबली. सकाळी पाणी ओसरल्यानंतर कर्मचाऱ्यांनी घोडसई ए.बी. स्विचपर्यंत लाईन चार्ज केली. त्यानंतर वझरोली भागात खोल पाणी असल्याने थेट प्रवेश कठीण झाला. अशा परिस्थितीत कर्मचाऱ्यांनी वाहनांच्या ट्यूबसद्वारे तात्पुरती नाव तयार केली. त्या साहाय्याने ए.बी. स्विच ऑपरेट करून वझरोलीपर्यंत लाईन चार्ज करण्यात यश मिळाले.



**बाप्पाच्या स्वागताची तयारी सुरू | मूर्तींची शंभर टक्के बुकींग**

## कापडी फेटेवाला गणरायाचा ट्रेंड

**प्रमोद जाधव**
**| अलिबाग |**

गणरायाचे आगमन येत्या २७ ऑगस्टला होणार आहे. त्यासाठी वेगवेगळ्या आकाराची, उंचीची मुर्ती बुकींगदेखील करण्यात आली आहे. यंदा कापडी फेटेवाला गणरायांचा ट्रेंड असल्याचे मुर्ती विक्रेत्यांकडून सांगण्यात आले आहे. वेगवेगळ्या रंगाचे फेटे, भरजरी कापडी धोतरला यावर्षी पसंती असल्याचे चित्र आहे.

बाप्पाचे आगमन बुधवारी (दि.२७) होणार आहे. त्यासाठी अवघे पाच दिवस शिल्लक राहिले असून बाप्पाच्या स्वागताची तयारी सुरु झाली आहे. घरोघरी रंगरंगोटी करण्याबरोबरच आसन सजावटीचे साहित्य, विद्यूत रोषणाई, पताके खरेदीसाठी बाजारात गर्दी झाली आहे. तसेच, गणेशमूर्ती कोणत्या प्रकारची असावी, यासाठी गणेश भक्तांनी मुर्तीच्या दुकानात जाऊन मुर्ती पसंतदेखील केल्या आहेत. शंभर टक्के बुकींगदेखील झाली आहे. दरवर्षी वेगवेगळ्या प्रकारच्या मुर्तींचा ट्रेंड असतो. यावर्षी कापडी फेटे व भरजरी धोतर असलेल्या गणेशमूर्तींचा ट्रेंड असल्याचे सांगण्यात आले आहे. अशा मूर्तींना अधिक मागणी आहे.



**मूर्तींच्या किंमतीत वाढ**

**पीओपी मूर्तींना यावर्षी अधिक मागणी असून पुरवठा कमी असल्यामुळे मूर्तींच्या किंमतीमध्ये २० टक्क्यांनी वाढ झाली आहे. त्यामुळे मूर्तीमागे पाचशे ते हजार रुपये अधिक मोजण्याची वेळ ग्राहकांवर आली आहे. दीड फुटाच्या मूर्तीची किंमत ३ हजार २००, दोन फुटाच्या मुर्तीची किंमत ५ हजार रुपये तर पाच फुटाच्या मुर्तीची किंमत २० हजारहून अधिक असल्याचे सांगण्यात आले आहे.**






# दांभिकांची नैतिकता

लोकसभेत काल घटनादुरुस्ती विधेयकावरून रणकंदन झाले. पंतप्रधान, मुख्यमंत्री किंवा साधा मंत्री याला एखाद्या गुन्ह्यात अटक होऊन एक महिना तुरुंगात राहावे लागले तर त्याला पदावरून जावे लागेल अशी तरतूद या घटनादुरुस्तीमध्ये आहे. आजवर अशी तरतूद करण्यात आली नव्हती. कारण, एखाद्या प्रकरणात आरोप झाले व प्रकरण अटक करण्यापर्यंत गेले तर तो मंत्री स्वतःहूनच राजीनामा देत असे. आजकाल तसे होत नाही. कारण, मुळात त्याच्याविरुध्दची कारवाई हीच बनावट व राजकीय असू शकते. मोदी सरकारने अशा डझनावारी कारवाया केल्या आहेत. यामुळे मोदी व अमित शाह यांच्या हुकुमशाहीचा नवीन टप्पा असेच या घटनादुरुस्तीचे वर्णन करावे लागेल. विरोधकांनी त्याला केलेला विरोध अत्यंत रास्त होता. यात पंतप्रधान वगैरेंचे नाव हे केवळ देखाव्यापुरते घालण्यात आले असून आपण किती नैतिक आहोत हे दाखवण्याचा हा प्रयत्न आहे. ही दांभिकांची नैतिकता आहे. नरेंद्र मोदी यांनी निवडणूक निधी गोळा करण्यासाठी आखलेली इलेक्टोरल बाँड्सची योजना ही भ्रष्ट व बेकायदा असल्याचे सांगून सर्वोच्च न्यायालयाने ती रद्द ठरवली. या योजनेतून भाजपने हजारो कोटी रुपये जमवले होते. ही योजना बेकायदा ठरवली याचाच अर्थ मोदी सरकारने भ्रष्टाचार केला. याची जबाबदारी पत्करून मोदींनी तेव्हा राजीनामा द्यायला हवा होता. पण तो तर दिला नाहीच. उलट याबाबतची आकडेवारी द्यायलाही टाळाटाळ केली. राफेल लढाऊ विमानांच्या खरेदीत भ्रष्टाचार झाला नाही असे न्यायालयाने म्हटले असले हे खरे. पण अनिल अंबानी नावाच्या सरकारी बँकांचे अब्जावधी रुपये बुडवणाऱ्या व खटले चालू असणाऱ्या इसमाला या विमान खरेदीशी संबंधित एक कंत्राट कोणाच्या सूचनेवरून मिळाले याचा खुलासा झाला नाही. मोदी सरकारच्या किमान संरक्षणमंत्र्यांनी याची जबाबदारी पत्करून राजीनामा द्यायला हवा होता. पंजाबातील शेतकरी आंदोलनाच्या काळात लखीमपूर खेरी इथे आंदोलकांच्या अंगावर जीप घालून दिवसाढवळ्या मारण्यात आले. मोदींचा गृहराज्यमंत्री अजय मिश्रा टेणी याच्या मुलाने हे कृत्य केल्याचे उघड झाले. आधी त्याला वाचवण्याचा प्रयत्न झाला. नंतर त्याला तुरुंगात टाकण्यात आले. अशा स्थितीत टेणीला निदान मंत्रिपदावरून हाकलायला हवे होते. पण मोदींनी ते केले नाही. आणि हे लोक आता नैतिकतेचा आव आणून विरोधकांना अनैतिक ठरवण्याचा प्रयत्न करीत आहेत.

## दोषी न ठरताच गुन्हेगार

लक्षात घ्या या विधेयकात वर्णन केलेला आहे तो न्यायालयाने दोषी ठरवल्यामुळे घडलेला तुरुंगवास नाही. हा केवळ पोलिसांनी गुन्हा दाखल करून अटक केल्यानंतरचा म्हणजे कच्च्या कैद्यांचा तुरुंगवास आहे. पोलिसांची चौकशी कितीही महिने चालू शकते व चार्जशीट दाखल न करता आरोपींना कितीही काळ तुरुंगात ठेवले जाऊ शकते. त्यांच्या चौकशीसाठी त्यांच्या जामिनाला विरोध करत राहायचे धोरण सरकारी पक्ष करीत राहतो. सध्या असंख्य प्रकरणांमध्ये आपल्याला हे दिसते. छगन भुजबळ यांचे उदाहरण तर प्रख्यात आहे. त्यांना याच रीतीने जवळपास अडीच वर्षे तुरुंगात ठेवण्यात आले होते. त्यांच्या जामिनाच्या अर्जांवरून सोशल मिडियामध्ये बरेच विनोदही प्रसारित झाले होते हे वाचकांना आठवत असेल. मुळात एखाद्या मुख्यमंत्र्याविरुद्ध भ्रष्टाचाराचे किंवा अन्य काही गंभीर आरोप झाले, वातावरण खूप तापले, पुरावे सादर झाले की बहुदा राजकीय तानमान बघून त्याचा पक्षच त्याला राजीनामा द्यायला सांगतो. त्या मुख्यमंत्र्याला अटक झाली व तो एक दिवस जरी तुरुंगात राहिला तरीही जनतेत इतका संताप होतो व त्या नेत्यालाही आपल्या प्रतिमेची काळजी असतेच, की, तो स्वतःहून राजीनामा देतो. आजवर तरी देशात असेच घडत आले आहे. काँग्रेसी सरकारांवर कितीही टीका केली तरी अनेक मंत्र्यांनी नुसत्या आरोपांनंतर राजीनामे दिले. पूर्वी अंतुले किंवा निलंगेकर या मुख्यमंत्र्यांवर आरोप झाले म्हणून ते गेले. अलिकडे मात्र काही नेत्यांनी अशा राजीनाम्याला नकार दिला आहे. पण हे केव्हा घडले तर जेव्हा आपल्याविरुध्दचे आरोप राजकीय आहेत, आपल्याला अटक करणे हे एक कारस्थान आहे याची त्या नेत्याला खात्री होती. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचे हेच म्हणणे होते. म्हणूनच त्यांनी अनेक महिने तुरुंगात राहूनही राजीनामा दिला नाही. नंतर निवडणुकांमध्ये भाजपने आम आदमी पक्षाचा व खुद्द केजरीवाल यांचाही पराभव केला हे ठीक. पण मुळात ज्या मद्य घोटाळ्यातील भ्रष्टाचाराचा आरोप करुन त्यांना ताबडतोब तुरुंगात टाकण्यात आले त्यात पुढे काहीही प्रगती झालेली नाही. त्यापूर्वी झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना जमिनीच्या खोट्या प्रकरणात अडकवण्याचा प्रयत्न झाला. त्यांनी राजीनामा दिला. पण उच्च न्यायालयाने प्रथमदर्शनी या खटल्यात काही दम नसल्याचे सांगून उडवून लावला. महाराष्ट्रात संजय राऊत पत्रा चाळ प्रकरणात तुरुंगात गेले. तिथेही शेवटी सरकारवर ताशेरे मारून राऊत यांना जामीन मंजूर केला.

## मित्रांवरही दहशत

ज्या सरकारची नियत व करणी इतकी खराब आहे त्याने नैतिकतेचा मुद्दा पुढे करून विरोधकांवर आरोप करावेत हा दांभिकतेचा कळस आहे. ही घटनादुरुस्ती आणण्याची वेळही सरकारच्या खुनशी प्रवृत्तीचे द्योतक आहे. एकीकडे निवडणुकीच्या मतदारयाद्यांमधील भानगडींबाबत राहुल गांधी यांनी केलेल्या आरोपांना उत्तर देताना भाजप व निवडणूक आयोगाची भंबेरी उडाली आहे. निवडणुकांमध्ये भाजप काहीतरी भानगडी करतो आहे अशी अनेक सामान्य जनांची खात्री पटली आहे. याच मुद्द्यावरून राहुल यांनी आयोजित केलेल्या मतदार अधिकार यात्रेला बिहारमध्ये प्रचंड पाठिंबा मिळतो आहे. या प्रश्नावरून लक्ष वळवण्यासाठी आणि विरोधकांवर बाजू उलटवण्यासाठी भाजपने घाईघाईने हे विधेयकआणले. त्याला विरोधक संसदेत विरोध करणार हे उघड होते. तसे झाले की भ्रष्टाचारी व गुन्हेगारी मंत्र्यांना विरोधकांना वाचवायचे आहे असा कांगावा करायला भाजप आता मोकळा राहणार आहे. याचा दुसरा पैलू हा भाजपच्या दगाबाज व गुंड मनोवृत्तीला साजेसा आहे. उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत विरोधकांनी माजी न्यायमूर्ती सुदर्शन रेड्डी यांच्या नावाचा प्रस्ताव दिला आहे. रेड्डी हे तेलुगू असल्याने चंद्राबाबू, जगन या सर्वांनीच त्यांना पाठिंबा दिला आहे. मोदींचे सरकार चंद्राबाबूंच्या पाठिंब्यावर अवलंबून आहे. ते या मुद्द्यापुरते का होईना, विरोधकांच्या गोटात जात असल्याने भाजपवाले संतापले आहेत. त्यासाठी हा इशारा म्हणून भाजपने ही घटनादुरुस्ती आणली आहे. एका जमीन प्रकरणाात चंद्राबाबू एकदा तुरुंगात जाऊन आलेले आहेत. त्यांनी फारच काँग्रेसची बाजू घेतली तर हे जुने प्रकरण कधीही बाहेर काढता येऊ शकते. जगन रेड्डी यांचीही अशीच प्रकरणे चालू आहेत. त्यामुळे भाजप विरोधकांना सोडाच, पण प्रसंगी, आपल्या तथाकथित मित्रांनाही धमकवण्यासाठी नवनवे कायदे करू शकतो हे या निमित्ताने उघड होत आहे. ओळखीचा चोर जीवे न सोडी अशी मराठीत म्हण आहेच. पण एकूणच पोलिसी कारवाया, इडीच्या धमक्या, विरोधकांविरुद्ध चौकशा, खटले यांच्या आधारावरच भाजपच्या या सत्तेचा डोलारा उभा आहे. मोदींची इतकी लोकप्रियता असूनही त्यांना या देशात लोकशाहीचे चांगले वातावरण निर्माण करता आलेले नाही. सत्ता टिकवण्यासाठी सतत दहशत दाखवणे हे हुकुमशहा करतात. मोदी-शहा यांच्या सरकारचे हेच चालू आहे.

---

विचार

# दुटप्पी ट्रम्प यांची पायावर कुऱ्हाड

***सात दिवसांमध्ये भारतावर दोनदा आयातशुल्क लादण्याचा निर्णय घेणारी दुटप्पी अमेरिका स्वतःही रशियातून आयात करत आहे. ट्रम्प यांच्या एककल्ली निर्णयाला आता ठोस प्रत्युत्तर देण्याचा निर्णय भारताने घेतला असून ३१ हजार कोटी रुपयांचा लढाऊ विमाने घेण्याचा करार थांबवून एक पाऊल टाकले आहे. भारत अमेरिकेतून आयात होणाऱ्या मालावर प्रत्युत्तर शुल्क आकारण्याचाही विचार करत आहे. या मुत्सद्देगिरीचा वेध.***



**जनार्दन पाटील**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियाकडून तेल आयात करण्यासाठी भारतावर ५० टक्के कर लादण्याची घोषणा केली; परंतु संपूर्ण जगाला माहीत आहे, की हा अमेरिकन अध्यक्षांचा दुटप्पीपणा आहे. अमेरिका आणि युरोपीय देश स्वतः रशियाकडून मोठ्या प्रमाणात तेल, वायू आणि खते खरेदी करतात. 'सेंटर फॉर रिसर्च ऑन एनर्जी अँड क्लीन एअर'ने एका विशेष अहवालात ट्रम्प यांचा हा दावा उघड केला आहे. भारतानेही अमेरिका रशियाकडून काय काय खरेदी करते, याचा पर्दाफाश केला आहे. ट्रम्प यांच्या दुटप्पीपणपुढे न झुकता 'जशास तसे' उत्तर देण्याचा निर्णय भारताने घेतला आहे. मुळात ट्रम्प 'ब्रिक्स' देशांवर नाराज आहेत. 'ब्रिक्स' देशांनी अमेरिकेच्या चलनाला आव्हान दिले आहे. त्यांनी स्वतःचे चलन वापरले आणि डॉलरमधील व्यवहार थांबवला, तर अमेरिकेचे चलन कमकुवत होऊ शकते, याची भीती ट्रम्प यांना वाटते. त्यामुळेच त्यांनी 'ब्रिक्स' देशांना स्वतःचे 'युरो'सारखे चलन व्यवहारात आणू नका, असे धमकावले आहे. ब्राझील, रशिया, चीन आणि भारत या देशांनी एकत्र येऊ नये, असा त्यांचा प्रयत्न आहे; परंतु ट्रम्प यांच्या 'टॅरिफ वॉर'मुळे आता हे देश एकत्र येण्याची शक्यता वाढली आहे. चीन आणि भारताने ट्रम्प यांच्या विरोधात भूमिका घेतली. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी लवकरच चीनच्या दौऱ्यावर जाणार आहेत. त्यामुळे आता ट्रम्प सावध झाले आहेत. त्यांनी चीनवर लादलेले आयात शुल्क आता नव्वद दिवस स्थगित करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. ट्रम्प यांच्या बाष्कळ बडबडीवर बराच काळ मौन बाळगल्यानंतर भारताने आपली भूमिका पूर्णपणे स्पष्ट केली आहे. सोबतच, कारवाईलाही सुरुवात केली आहे.

भारत आणि अमेरिकेदरम्यान व्यापारासंदर्भात अनेक बाबतीत मतभेद आहेत. अमेरिकेला आपली शेती उत्पादने भारतात पाठवायची आहेत. भारत मात्र अमेरिकी कृषी उत्पादने स्वीकारायला तयार नाही. त्याचे कारण अमेरिकेतील गाईंना मांस खाऊ घातले जाते. या गाईंची दूध उत्पादने आणि दुग्धजन्य पदार्थ खाण्याचा प्रश्न भारताच्या दृष्टीने भावनिक आहे. त्यामुळे भारताने या उत्पादनांच्या आयातीला विरोध केला आहे. एका अहवालानुसार या 'टॅरिफ वॉर' दरम्यान भारताने मोठी कारवाई केली आहे.

भारताने नौदलासाठी अमेरिकेच्या बोईंग कंपनीकडून सहा पी-८१ पोसायडॉन विमाने खरेदी करण्याचा करार केला होता. ही विमाने समुद्रात देखरेखीसाठी महत्वपूर्ण आहेत. भारताच्या विशाल सागरी क्षेत्रामुळे नौदलाला अशा अनेक विमानांची आवश्यकता आहे. ही अतिशय आधुनिक आणि प्रगत विमाने आहेत आणि अरबी समुद्रापासून हिंदी महासागरापर्यंत चीनच्या वाढत्या प्रभावावर लक्ष ठेवण्यासाठी त्यांची खूप आवश्यकता आहे.

'आयडीआरडबल्यू' या संरक्षणविषयक संकेतस्थळाच्या वृत्तानुसार भारताने तीन ऑगस्ट रोजी हा करार थांबवण्याचा निर्णय घेतला. नौदलाकडे अशी बारा विमाने आहेत. भारताने २००९ मध्ये बोईंग कंपनीकडून ती खरेदी केली. त्यानंतर भारत अमेरिकेकडून ही विमाने खरेदी करणारा पहिला आंतरराष्ट्रीय खरेदीदार बनला. २००८ मध्ये आठ विमानांसाठी पहिला करार झाला. त्या वेळी त्याची किंमत २.२ अब्ज डॉलर्स म्हणजेच सुमारे १९ हजार कोटी रुपये होती. त्यानंतर २०१६ मध्ये भारताने अशी आणखी चार विमाने खरेदी केली. त्यावर सुमारे ८५०० कोटी रुपये खर्च झाले.

मे २०२१ मध्ये अमेरिकेने भारताला अशा सहा विमानांच्या विक्रीला मान्यता दिली. या कराराची किंमत सुमारे २.४२ अब्ज डॉलर्स (सुमारे २१ हजार कोटी रुपये) असणार होती. हा करार पूर्व नौदल कमांडसाठी होता; परंतु नंतर वाढत्या खर्चामुळे हा करार अडकला. जुलै २०२५ पर्यंत या कराराची किंमत ३.६ अब्ज डॉलर्स म्हणजेच सुमारे ३१,५०० कोटी रुपये झाली. असे असूनही, भारत सरकार या वर्षी पुन्हा हा करार निश्चित करणार होते. हिंद महासागरात चीनच्या नौदल कारवायांवर बारीक लक्ष ठेवण्यासाठी हे खूप प्रभावी अस्त्र ठरु शकते; परंतु अमेरिकेच्या अध्यक्षांच्या 'टॅरिफ वॉर'मुळे भारताने हा करार थांबवला आहे. हा करार पूर्णपणे रद्द होणे हा 'बोईंग'साठी मोठा धक्का ठरेल. 'बोईंग'ने भारतात सुमारे पाच हजार लोकांना रोजगार दिला आहे. ती १.७ अब्ज डॉलर्स म्हणजेच सुमारे १५ हजार कोटी रुपयांचा व्यवसाय करते. हा करार थांबवल्याने भारतीय नौदलाच्या ताकदीवर परिणाम होऊ शकतो. या विमानांचा वापर भारताच्या सागरी क्षेत्रातील शेकडो नौदल जहाजांवर तसेच २० हजार व्यापारी जहाजांवर लक्ष ठेवण्यासाठी केला जातो. तथापि, भारत स्वतःचे पाळत ठेवणारे विमान तयार करत आहे.

भारत आणि अमेरिकेतील संबंध टॅरिफवरून बिघडत चालले आहेत. चर्चेच्या अनेक फेऱ्यांनंतरही ट्रम्प यांनी एकतर्फी निर्णय घेत भारतावर ५० टक्के कर लादला. काही काळ भारत आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे कौतुक करणारे अध्यक्ष ट्रम्प इतके कठोर कसे झाले, त्यांनी ५० टक्के कर का लादला, अमेरिकेला नेमके काय हवे आहे असे अनेक प्रश्न या निमित्ताने उभे राहिले. त्याचे थेट उत्तर म्हणजे अमेरिका भारताला आपला मांडलिक बनवू इच्छिते; परंतु भारत तसे होऊ देत नाही. भारत निर्णय घेण्याच्या आपल्या वृत्तीवर ठाम आहे. नेमके हेच अमेरिकेला आवडत नाही. म्हणूनच अमेरिका आता भारतावर दबाव आणण्यासाठी शुल्कवाढ हे आपले सर्वात मोठे शस्त्र बनवत आहे. भारत काहीही न बोलता अमेरिकेला उत्तर देत आहे.

युक्रेन युद्धादरम्यान रशियाकडून तेल खरेदी आणि रशिया आणि युक्रेनच्या मुद्द्यावर भारत तटस्थ राहण्याची पद्धत अमेरिकेला आवडलेली नाही. भारताने आपल्या म्हणण्याप्रमाणे वागावे, अशी अमेरिकेची इच्छा आहे. अमेरिकेला वाटते की भारताने तेल खरेदी केल्यामुळे रशियाला युद्धासाठी पैसे मिळाले. त्यामुळे रशिया युक्रेनशी युद्ध संपवण्यास तयार नाही. तथापि, चीनदेखील रशियाकडून तेल खरेदी करत आहे. भारत रशियाकडून स्वस्त तेल खरेदी करत आहे. फेब्रुवारी २०२२ मध्ये युक्रेनशी युद्ध सुरू होण्यापूर्वी भारत दररोज सुमारे ६८ हजार पिंप कच्चे तेल खरेदी करत होता. मे २०२३ मध्ये ते वाढून २१.५ लाख पिंप झाले. आज भारत आपल्या तेलाच्या गरजेच्या सुमारे ४० टक्के कच्चे तेल रशियाकडून खरेदी करीत आहे. भारताची ही कृती ट्रम्प युद्धग्रस्त रशियाला आर्थिकदृष्ट्या मदत मानतात.

चीनच्या वाढत्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर भारताला अमेरिकेशी संबंध मजबूत करण्यासाठी आणि पाश्चात्य लष्करी आघाडीच्या जवळ जाण्यासाठी वाढत्या दबावाचा सामना करावा लागत आहे. भारताने पारंपारिक मित्र रशिया आणि ब्रिक्स देशांना सोडून पाश्चात्य गटात सामील व्हावे, अशी अमेरिकेची इच्छा आहे. अमेरिका बऱ्याच काळापासून भारताला आपल्या बाजूने वळवण्याचा प्रयत्न करत आहे.

भारताव्यतिरिक्त 'ब्रिक्स' गटामध्ये ब्राझील, चीन आणि रशिया सारखे महत्त्वाचे देश समाविष्ट आहेत आणि अमेरिकेला जगातील पाश्चात्य प्रभाव कमी करायचा आहे. युक्रेनप्रमाणे भारताचा 'वापर' करायचा आहे. यासोबतच अमेरिका चीनविरुद्ध भारताचा वापर करू इच्छिते. रशियाविरुद्ध युक्रेनचा वापर केला त्याच प्रकारे भारताचा वापर करण्याची अमेरिकेची इच्छा आहे. अमेरिका भारताच्या धोरणात्मक स्वायत्ततेवर नाराज आहे आणि हीच ट्रम्प यांची खरी समस्या आहे.

धोरणात्मक स्वायत्तता म्हणजे कोणत्याही देशाने आपले राष्ट्रीय हित लक्षात घेऊन पुढे जाणे आणि इतर देशांवर जास्त अवलंबून राहण्याऐवजी स्वतःचे स्वतंत्र परराष्ट्र धोरण स्वीकारणे. ट्रम्प यांच्या कर धोरणावर भारताने टीका केली आहे. अमेरिकेच्या शुल्कवाढीला चोख प्रत्युत्तर दिले आहे. अमेरिकेचे हे पाऊल अन्याय्य आणि अतार्किक असल्याचे भारताने म्हटले आहे. अमेरिका स्वतःच्या अटींवर भारताशी व्यापार करार करू इच्छिते. त्याच वेळी भारत आपल्या लहान शेतकऱ्यांच्या फायदा समोर ठेवून अमेरिकेचा मनमानी व्यापार करार स्वीकारण्यास तयार नाही. अशा कोणत्याही व्यापार करारामुळे भारतातील लहान शेतकरी आणि व्यावसायिकांचे नुकसान व्हावे असे भारताला वाटत नाही. ट्रम्प सत्तेत आल्यापासून रशिया-युक्रेन युद्ध संपवण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांनी याबाबत सर्वतोपरी प्रयत्न केले, पण यश आले नाही. अशा परिस्थितीत त्यांनी रशियाला धडा शिकवण्यासाठी भारताला आपले शस्त्र बनवले आहे.

---

# पिठोरी पूजन (मातृदिन)



**ज्योती म्हात्रे**

भारतीय संस्कृतीत ''माता'' हाच सृष्टीचा मूलाधार मानला गेला आहे. संततीचे कल्याण, आरोग्य आणि दीर्घायुष्य यासाठी माता जी उपासना करते, त्यात पिठोरी अमावस्या (म्हणजेच मातृदिन) विशेष स्थान आहे. हा दिवस केवळ धार्मिक व्रत नसून आईच्या निःस्वार्थ भावनेचे व त्यागमय शक्तीचे प्रतीक आहे.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी**

भाद्रपद कृष्ण पक्षातील अमावस्येला पिठोरी अमावस्या पाळली जाते. याची मुळे वैदिक व पुराणकालीन परंपरेत दिसतात.

स्कंद पुराणात व्रतकथेचे वर्णन असून यात 'संततीचे रक्षण व वृद्धी'' हा प्रमुख उद्देश आहे.

**पूजनकथा**

लोकमान्यतेनुसार एकेकाळी एका राणीला अनेक मुलं असूनसुद्धा त्यांचा अकाली मृत्यू होत असे. दुःखाने ग्रस्त राणीला एका ऋषींनी ''पिठोरी व्रत'' सांगितले. राणीने पीठापासून ६४ योगिनींच्या प्रतिमा बनवून मातृदेवतेची पूजा केली. तिच्या प्रार्थनेने मुलांचे रक्षण झाले. या कथेवरून पिठोरी पूजन ही परंपरा प्रचलित झाली.

पूजन पद्धती

१. स्नान व संकल्प- स्त्री उपवास करून व्रताचा संकल्प घेते.

२. पीठाची मूर्ती निर्मिती- ६४ योगिनी व मातृदेवता यांच्या पीठातील मूर्ती किंवा प्रतिके बनवली जातात.

३. पूजन व नैवेद्य- फुले, दुर्वा, अक्षता, हळद-कुंकू अर्पण करून देवीला नैवेद्य दाखविला जातो.

४. कथा वाचन- संध्याकाळी व्रतकथा ऐकली जाते.

५. आरती व उद्यापन- देवीची आरती करून व्रताची सांगता केली जाते.

**धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व**

संततीच्या दीर्घायुष्य, आरोग्य व यशासाठी आईची प्रार्थना.

''मातृदेवो भव'' या वेदवचनाची अनुभूती.

मातृत्वाचा त्याग, माया व जपण्याची भावना अधोरेखित करणारा दिवस.

महिलांच्या एकत्र येऊन केलेल्या सामूहिक पूजनामुळे सामाजिक ऐक्य वृद्धिंगत होते.

**आधुनिक संदर्भ**

आज पाश्चात्य पद्धतीने ''मदर्स ड'' एका दिवसापुरता साजरा होतो. पण आपल्या परंपरेतील पिठोरी अमावस्या हा खरा मातृदिन आहे. तो केवळ आईवर प्रेम व्यक्त करणारा दिवस नाही, तर आईने मुलांच्या कल्याणासाठी उपवास प्रार्थना आणि व्रत करणे ही त्याची वैशिष्ट्ये आहेत.

**निष्कर्ष**

पिठोरी पूजन हा फक्त धार्मिक विधी नसून आईच्या उदात्ततेचे आणि मातृशक्तीच्या सामर्थ्याचे सांस्कृतिक दर्शन आहे. संततीसाठी आई जेव्हा देवीचे स्मरण करून प्रार्थना करते, तेव्हा ती स्वतः देवतेचे रूप धारण करते. म्हणूनच पिठोरी अमावस्या हा दिवस मातृदिन म्हणून भारतीय संस्कृतीत विशेष महत्वाचा ठरतो.

पिठोरी अमावस्या ही स्त्रीप्रधान परंपरा आहे. माता आपल्या मुलांच्या सुरक्षिततेसाठी देवतेचे स्मरण करून निसर्गाशी एकरूप होते. त्यामुळे या सणाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. पिठोरी पूजनासाठी लागणारी फुले, तेरड्याची फुले विक्रीसाठी गुरूवारी बाजारपेठा फुलून गेल्या. या खरेदीसाठी महिलांनी बाजारपेठांमध्ये प्रचंड गर्दी केल्याचे चित्र दिसून आले. गेल्या अनेक वर्षांची परंपरा जपण्याचे काम या सणाच्या माध्यमातून होत असल्याचे दिसून येत आहे.

---

लोकसंसद

## राजकारणाचे गुन्हेगारीकरण रोखणे हाच मख्य हेतू असावा

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी संसदेत मांडलेल्या एका महत्त्वाच्या विधेयकानुसार, मुख्यमंत्री, पंतप्रधान किंवा मंत्री यांच्यावर गंभीर गुन्ह्यांचे आरोप झाल्यास त्यांना ३० दिवसांच्या आत पद सोडावे लागेल. अन्यथा त्यांना पदावरुन हटवण्याची तरतुद या विधेयकानुसार असणार आहे. त्यामुळे संसदेत व समाजमाध्यमांवर मोठी चर्चा रंगली असून विरोधकांनी याला जोरदार विरोध दर्शविला आहे. या विधेयकाचा उद्देश राजकारणातील गुन्हेगारीकरण रोखण्याचा आहे. हे खरे तर अत्यंत स्वागतार्ह पाऊल म्हणावे लागेल. कारण गंभीर आरोपांखाली असलेली व्यक्ती पदावर कायम राहिली तर चौकशी व न्यायप्रक्रियेत अडथळे निर्माण होतात. लोकशाहीतील जनप्रतिनिधींनी नैतिकतेच्या निकषांचे पालन करणे अपेक्षित आहे. म्हणून आरोप सिद्ध होईपर्यंत तरी त्यांनी स्वेच्छेने राजीनामा द्यावा हीच लोकभावना असते आणि नैतिकतेच्या दृष्टीने ते योग्यही असते. मात्र यातील दुसरी बाजूही तितकीच महत्त्वाची आहे. आरोप ''सिद्ध'' होण्याआधीच पद गमावण्याची वेळ आल्याने निरपराधी ठरवले जाईपर्यंत दोषी नाही या न्यायाच्या मूलभूत तत्त्वावर प्रश्नचिन्ह उभे राहते. याहूनही गंभीर म्हणजे सत्ताधारी पक्ष या तरतुदीचा वापर राजकीय सूड उगवण्यासाठी करू शकतो. विरोधकांवर खोटे आरोप लावून त्यांना पदावरून हटविणे सोपे होईल. त्यामुळे विरोधी पक्ष या विधेयकाला तीव्र विरोध करत आहेत. तसं पाहायला गेलं तर या विधेयकाची दिशा योग्य आहे पण अंमलबजावणी करताना काही सुरक्षितता आवश्यक आहे. चौकशी व निर्णय प्रक्रियेवर स्वतंत्र न्यायालयीन देखरेख असणे गरजेचे आहे. तसंच, आरोप किती गंभीर आहेत आणि त्यांना प्राथमिक पुराव्यांचा आधार किती आहे, हे निश्चित करण्यासाठी स्वतंत्र समिती वा आयोगाची तरतूद व्हायला हवी. थोडक्यात, हे विधेयक जर खरोखरच राजकारणातील गुन्हेगारीकरण रोखण्यासाठी असेल, तर त्याला विरोधकांनीही आंधळेपणाने नाकारू नये. उलट आवश्यक सुधारणा सुचवून त्याला अधिक प्रभावी बनवण्याचा प्रयत्न करावा. अन्यथा या कायद्याचे रूपांतर लोकशाहीसाठी धोकादायक अशा दुधारी शस्त्रात होईल.

**- दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

---

दिनविशेष

# शहरांचे योग्य नियोजन करा नाही तर नैसर्गिक आपत्तीचे बळी बना

मुसळधार पावसाने मुंबईसह नवीमुंबई, ठाणे, पालघर, रायगड या जिल्ह्यात हाहाकार उडवला. मुंबई उपनगरात २४ तासात २३८.२ मिलिमीटर पाऊस झाला तर ठाणे शहरात १३३ मिलिमीटर पाऊस पडला. मुंबई शहरातही ११० मिलिमीटर इतका पाऊस झाला. कोकणातही पावसाने अशीच तडाखेबंद हजेरी लावली. केवळ मुंबई, ठाणे आणि कोकणच नव्हे तर संपूर्ण राज्यात पावसाने दाणादाण उडवली. पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सातारा सांगली, कोल्हापूर या जिल्ह्यात मुसळधार पाऊस पडला. नाशिकमध्येही पावसाने कहर केला. विदर्भात नागपूर, अमरावती, यवतमाळ, वर्धा, भंडारा, गोंदिया या जिल्ह्यांना पावसाने तडाखा दिला तीच परिस्थिती मराठवाड्यातही झाली एकूणच पावसाने सपूर्ण राज्यात कहर केला. गेल्या काही दिवसांपासून दडी मारून बसलेल्या पावसाने असे रौद्ररूप धारण केले की सर्वांचीच पाचावर धारण बसली. या पावसाने मोठ्या प्रमाणात वित्तहानी तर झालीच पण काही ठिकाणी जीवितहानी देखील झाली. नद्या, नाल्यांना पूर आला. अनेकांचा संसार पाण्यात बुडाला, शेतीवाडी पाण्याखाली गेल्याने हातातोंडाशी आलेला घास हिरावून गेल्याने बळीराजा हताश झाला. क्षणात होत्याचे नव्हते झाले. देशाची आर्थिक राजधानी असलेली आणि कधीही न थांबणारी मुंबईही या पावसाने काही काळ ठप्प झाली. जोरदार पावसाने मुंबईचे जनजीवन विस्कळीत झाले. शाळा, महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली. जागोजागी पाणी तुंबल्याने रस्त्यांवर गुडघाभर पाणी साचले. लोकांच्या घरात पाणी आले. त्यामुळे अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले. रस्त्यांवर पाणी आल्याने रस्ते वाहतूक खोळंबली त्यामुळे वाहतूक कोंडी झाली. काही ठिकाणी दरड कोसळल्याने महामार्ग बंद झाले. रेल्वे मार्गावर पाणी साचून रुळ पाण्याखाली गेल्याने लांब पल्ल्याच्या अनेक गाड्या रद्द कराव्या लागल्या. पावसाचे पाणी रेल्वे स्थानकावरून धबधब्याप्रमाणे ओसंडून वाहत होते. पावसामुळे रेल्वेचे वेळापत्रक कोलमडले. पावसामुळे तांत्रिक बिघाड झाल्याने मोनोरेल जाग्यावरच थांबली. त्यात शेकडो प्रवासी अडकले. आपत्ती व्यवस्थापन आणि अग्निशामक जवानांच्या पथकाने आपली जबाबदारी चोख पार पडल्याने प्रवाशांची सुरक्षित सुटका झाली. केवळ नशीब बलवत्तर होते म्हणूनच प्रवाशांचा जीव वाचला. या पावसाने २६ जुलै २००५ ला मुंबईत झालेल्या पावसाची आठवण करून दिली. त्यावेळी झालेल्या पावसात देखील मुंबईची अशीच अवस्था झाली होती. २६ जुलैच्या पावसानंतर आपण कोणताही धडा घेतला नाही म्हणूनच ही वेळ पुन्हा आली. शहरीकरण करताना नागरी नियोजनाची आखणी न केल्याने शहरांच्या सीमा वाढत गेल्याने ही परिस्थिती निर्माण झाली आहे. नियोजनाचा आराखडा तयार न करता कागदावरील नकाशाच्या सीमा वाढवून महानगराची मांडणी करणारे शासन आणि प्रशासन याला जबाबदार आहे. मुंबई पुण्यासारख्या मोठ्या शहरांच्या सीमा विस्तारित चालल्या आहेत. या शहरात दरवर्षी नव्या गावांची भर पडत आहे. नगर नियोजनाकडे गांभीर्याने न पाहता नागरीकरणाचा निर्णय घेतल्याने ही पूरस्थिती निर्माण झाली. महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद आणि एमएमआरडीए यांचा एकत्र मेळ बसत नसल्याने शहरांचे नियोजन कोलमडत आहे. उघडी गटारी, तुंबलेले नाले, अनधिकृत बांधकामे, अरुंद रस्ते, वाढती लोकसंख्या, सिमेंटची वाढती जंगले, सिमेंटची रस्ते, जागोजागी बसवलेली पेव्हिंग ब्लॉक्स या सर्वांचा एकत्रित परिपाक म्हणजे ही पूरस्थिती. सरकारने आतातरी जागे होऊन शहर नियोजनाचा योग्य निर्णय घ्यावा अन्यथा भविष्यात यापेक्षाही भीषण परिस्थितीला सामोरे जागे लागेल.

**- श्याम ठाणेदार,**
**दौंड जिल्हा पुणे**

# जानवळे ग्रामपंचायत धोकादायक

## • गटविकास अधिकाऱ्यांकडून पाहणी; इमारतीमध्ये कामकाज न करण्याच्या सूचना

। गुहागर । प्रतिनिधी ।

मुळातच धोकादायक असलेली तालुक्यातील जानवळे ग्रामपंचायत इमारत गेले अनेक दिवस होत असलेल्या अतिवृष्टीमुळे अधिकच धोकादायक झाली आहे. या इमारतीची गुहागर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी प्रमोद केळसकर यांनी पाहणी करून धोकादायक झालेल्या इमारतीचा अहवाल तात्काळ जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पाठवण्यात येईल असे स्पष्ट केले. तसेच, या इमारतीत सध्यस्थीतीत कामकाज न करण्याच्या सूचनादेखील ग्रामपंचायत प्रशासनाला दिल्या आहेत.



या इमारतीसाठी निधी उपलब्ध होण्यासाठी मनसेचे उपजिल्हाध्यक्ष विनोद जानवळकर यांनी स्वातंत्र्यदिनी पंचायत समिती गुहागर कार्यालयासमोर उपोषणाला बसणार असल्याचा इशारा दिला होता. यावेळी सदरचे उपोषण स्थगित करावे अशी विनंती प्रशासनाकडून उपजिल्हाध्यक्ष विनोद जानवळकर यांना करण्यात आली होती. त्यामुळे त्यांनी तूर्तास उपोषण स्थगित केले होते. परंतु, गेली अनेक दिवस झालेल्या अतिवृष्टीमुळे ही इमारत जास्त धोकादायक बनली आहे. या इमारतीचे बांधकाम अधिकच धोकादायक बनले आहे. याचीच दखल घेऊन सदर इमारतीची तत्काळ गटविकास अधिकारी प्रमोद केळसकर यांनी पाहणी केली. सदरच्या इमारतीमध्ये कामकाज करू नये अशा सूचना गटविकास अधिकारी यांनी ग्रामपंचायत प्रशासनाला यावेळी दिल्या आहेत.

यावेळी बोलताना मनसे जिल्हा उपाध्यक्ष विनोद जानवळकर यांनी सांगितले की, जानवळे गावातील ग्रामपंचायतीच्या इमारतीची दयनीय अवस्था झाली असून इमारत पूर्णपणे नादुरुस्त आहे. या इमारतीत बसणारे व काम करणारे कर्मचारी व पदाधिकारी जीव मुठीत घेऊन बसतात. गेली अनेक दिवस झालेल्या अतिवृष्टीमुळे ग्रामपंचायत इमारत अधिकच धोकादायक बनली आहे. परंतु ग्रामपंचायत इमारतीसाठी अद्यापही निधी देण्यात आलेला नाही. एकीकडे ग्रामपंचायतकडून कुठलाही प्रस्ताव व मागणी नसताना जानवळे ओझरवाडी येथे ३० लाख रुपये खर्च करून साकव बांधण्यात आला. यासाठी जिल्हा नियोजनामधून ३० लाख रुपयांचा निधी देण्यात आला. परंतु, गावाच्या विकासासाठी असलेल्या ग्रामपंचायत इमारतीसाठी गेली अनेक वर्षे शासनाकडे निधीची मागणी करून देखील लागणारा निधी मिळत नसल्याची खंत आहे. शासन एकीकडे विनाकारण, विना मागणी कामासाठी लाखो रुपये निधी खर्च करत असून आणि जे गरजेचे आहे यासाठी निधी उपलब्ध केला जात नाही हे योग्य नाही. सदर इमारत कोसळून गंभीर अपघात झाल्यास याला जबाबदार शासन असेल का, असाही सवाल जानवळे गावचे रहिवासी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उपजिल्हा अध्यक्ष विनोद गणेश जानवळकर यांनी उपस्थित केला आहे.

गेली अनेक वर्षे पंचायत समिती गुहागर व जिल्हा परिषद रत्नागिरी यांच्याकडे मागणी करूनही नवीन इमारतीसाठी निधी देण्यात आलेला नाही.

## 'संतोष शिंगाडेंचा गौरव प्रेरणादायी'

। पाताळगंगा । प्रतिनिधी ।

पनवेल तालुक्यातील आपटा-सारसई येथील समाजसेवक संतोष राम शिंगाडे यांना मिळालेला राजमाता अहिल्यादेवी होळकर महाराष्ट्र रत्न पुरस्कार हा केवळ त्यांचा व्यक्तिगत गौरव नसून, समाजसेवेच्या क्षेत्रातील प्रत्येक कार्यकर्त्यांच्या प्रयत्नांना मिळालेली दखल आहे. तसेच त्यांना मिळालेला पुरस्कार म्हणजे समाजसेवक संतोष शिंगाडे यांचा गौरव म्हणजे समाजकार्याला नवे बळ, असे गौरोदगार राष्ट्रीय समाज महाराष्ट्र राज्य कार्यकारिणी सदस्य भगवान ढेबे यांनी व्यक्त केले. तसेच, शिंगाडे यांनी आदिवासी, वंचित व गरजू घटकांसाठी सातत्याने काम केले आहे. त्यामुळे त्यांना हा मानाचा पुरस्कार मिळणे हे अत्यंत योग्य आहे, असेही ते म्हणाले.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२२ ऑगस्ट

१) श्री. सुरेश परशुराम पित्रे
अलिबाग, २२-८-१९५२

२) श्री.विलास विठोबा अलिबागकर
वरसोली, अलिबाग, २२-८-१९५४

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**


**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते



**रेखा मधुकर पुनतांबेकर, मातृदिन, नागाव अलिबाग**

## सुवर्णकण



विषय भोग आणि जीवनाच्या गरजा यामधील फरक निर्विकार अंतकरणाने आपण जाणून घेतला पाहिजे.

**श्रीज्ञानेश्वर भावहृदय
आबामहाराज परांजपे
साधना आश्रम,
दातार आळी, पेण**

## राजीव गांधी यांची जयंती

**नेरळ** : कर्जत तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने देशाचे माजी प्रधानमंत्री राजीव गांधी यांची जयंती साजरी करण्यात आली. कर्जत तालुका काँग्रेस कमिटीच्या नेरळ येथील तालुका कार्यालयात राजीव गांधी यांची जयंती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तालुका अध्यक्ष संजय गवळी तसेच ज्येष्ठ कार्यकर्ते सूर्यकांत पाटील, सूरज पंडित, संतोष सूरवसे, मनोहर पाटील आदी उपस्थित होते.

## जागतिक डास दिनानिमित्त मार्गदर्शन

**तळा** : प्राथमिक आरोग्य केंद्र तळा येथे जागतिक डास दिनानिमित्त तसेच कायाकल्प अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र तळा, महागाव व मांदाड यांची मुल्यांकन करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. याप्रसंगी डॉ. अश्विनी सपकाळ जिल्हा हिवताप अधिकारी व डॉ. वंदनकुमार पाटील तालुका आरोग्य अधिकारी तळा यांनी जागतिक डास दिनाबाबत डास आळी प्रतिबंधाबाबत मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी हिवतापावर संशोधन करणाऱ्या रोनाल्ड रॉस यांच्या संशोधनासंदर्भात माहीती दिली. तसेच, कायाकल्प अंतर्गत स्वच्छतेची पाहणी केली.

# वनवासी विद्यार्थांची आरोग्य तपासणी

। पनवेल । प्रतिनिधी ।

रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलमार्फत गेली ३५ वर्षे सातत्याने वनवासी कल्याण आश्रम चिंचवली येथील विद्यार्थी आरोग्य दत्तक योजना राबविली जात आहे. याअंतर्गत वनवासी कल्याण आश्रम चिंचवली येथील विद्यार्थ्यांचे आरोग्य तपासणी शिबीर, मोफत औषधे वाटप, खाऊ वाटप, आणि तेथील १० वीच्या विद्यार्थ्यांना उपयुक्त असे Ideal Study Appचे वाटप करण्यात आले.



यावेळी डॉ. तुषार जोशी, डॉ. चंद्रात्रे, डॉ. मिलिंद घरत यांनी विद्यार्थ्यांची तपासणी केली. फार्मासिस्ट लीना घोडिंदे यांनी रो. मनोज आंग्रे यांच्या सहकार्याने औषधे वाटप केली. त्यानंतर अँनस यांनी खाऊचे वाटप केले, तर दीपक गडगे आणि डॉ. मिलिंद घरत यांच्या हस्ते ॲपचे वाटप करण्यात आले. नेहमीप्रमाणेच या शिबिराचे सुयोग्य नियोजन डॉ. लक्ष्मण आवटे यांनी केले. याप्रसंगी अध्यक्ष अनिल ठकेकर, अतिश थोरात, दीपक गडगे उपस्थित होते.

## क्षयरोग रुग्णांना पौष्टिक आहार वाटप

**कोर्लई** : लायन्स क्लब ऑफ मुरुड जंजिराचे प्रेसिडेंट लायन सॅमसन उर्फ सनी सोगावकर यांची राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमाअंतर्गत तालुकास्तरीय टीबी फोरम समितीवर सदस्यपदी नेमणूक करण्यात आली आहे. लायन्स क्लब आणि सनी सोगावकर यांच्या पुढाकारातून तालुक्यातील दहा क्षयरोग रुग्णांना सहा महिन्याचे पौष्टिक अन्न देण्यात येणार आहे. याचाच भाग म्हणून तहसीलदार आदेश डफळ यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवारी (दि.१८) तहसील कार्यालयात एका महिन्याचे पौष्टिक अन्न दहा क्षयरोग रुग्णांना देण्यात आले.

# समाज क्रांती राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा

। अलिबाग । प्रतिनिधी ।

बी. एस. बहुउद्देशीय संस्था, अमरावती, श्री संत कबीर बहुउद्देशीय संस्था, बुलढाणा, आणि उपेक्षित नायक यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि.१७) अमरावती येथील साई पॅलेस हॉटेलमध्ये या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. यावेळी रायगड येथील सुप्रसिद्ध विनोदी कलाकार 'दगडी चाळ २' चित्रपट फेम योगेश पवार यांना नुकत्याच झालेल्या समाज क्रांती राज्यस्तरीय पुरस्कार २०२५ सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून आमंत्रित करुन सन्मानित करण्यात आले.



योगेश पवार यांची प्रमुख उपस्थिती

या सोहळ्याला अनेक रिल्स स्टार, कलाकार, दिग्दर्शक, आणि सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी, विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना त्यांच्या योगदानाबद्दल गौरवण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले विनोदी कलाकार योगेश पवार यांनी त्यांच्या खास विनोदी शैलीने उपस्थितांची मने जिंकली.

याच कार्यक्रमात बिहाली या आगामी हिंदी चित्रपटाच्या तसेच शिर्डी येथे होणाऱ्या एका भव्य फॅशन शोच्या पोस्टरचेही अनावरण करण्यात आले.

# श्रीवर्धनमध्ये भ्रमणध्वनी सेवा विस्कळीत

## नागरिकांसह शासकीय कार्यालयांना फटका

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

श्रीवर्धन तालुक्यात सध्या वारंवार वीजपुरवठा खंडित होण्याच्या समस्येने नागरिक त्रस्त झालेले असतानाच आता भ्रमणध्वनी सेवाही खंडित होत आहे. त्यामुळे नागरिकांना मोठ्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. भारतीय संचार निगम मर्यादित सेवेबद्दल ग्राहकांच्या तक्रारी वाढत असतानाच आता खासगी भ्रमणध्वनी कंपन्यांची सेवाही विस्कळीत होत आहे. ऐन पावसाळ्यात या समस्या निर्माण झाल्याने याचा फटका शासकीय कार्यालये तसेच नागरिकांना बसत आहे.

निसर्ग व तौक्ते चक्रीवादळ या नैसर्गिक आपत्तीवेळी भ्रमणध्वनी यंत्रणा पूर्णपणे ठप्प झाल्याने रायगड जिल्ह्यात मोठी गंभीर समस्या निर्माण झाली होती. तत्कालीन रायगड जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती निवारण प्राधिकरण अध्यक्ष महेंद्र कल्याणकर यांनी जिल्ह्यात सेवा देणाऱ्या सरकारी व सर्व खासगी भ्रमणध्वनी कंपन्यांच्या अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करीत येणाऱ्या काळात भ्रमणध्वनी सेवा ही अखंडित उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले होते. श्रीवर्धन



तालुक्यात सध्या भ्रमणध्वनीच्या खासगी कंपन्यांची सेवा तसेच भारतीय संचार निगम मर्यादित सेवा वारंवार पूर्ण ठप्प होत आहेत.

आपतग्रस्तांनी आपत्ती नियोजन कक्षाशी संपर्क साधल्यास त्याच तात्काळ मदत उपलब्ध होईल, असे शासकीय पातळीवरून सांगण्यात येते. परंतु, त्याकरिता भ्रमणध्वनी सेवा विनाखंड सुरू ठेवण्याची जबाबदारीही संबंधित कंपन्यांची आहे. जिल्हा आपत्ती निवारण यंत्रणेच्या माध्यमातून भ्रमणध्वनी सेवा अखंडित सुरू ठेवण्यासाठी आवश्यक कार्यवाही होणे गरजेचे आहे.

### खंडित वीजपुरवठ्याचा परिणाम

वीजपुरवठा खंडित झाल्यावर भ्रमणध्वनी सेवा तात्पुरती बंद पडू शकते. भ्रमणध्वनी टॉवरचा वीजपुरवठा खंडित झाल्यास तेथील बॅटरी किंवा जनरेटरद्वारे तात्पुरता वीजपुरवठा मिळतो, परंतु तो मर्यादित वेळेसाठीच असतो. यामुळे, वीजपुरवठा जास्त वेळ खंडित झाल्यास भ्रमणध्वनी सेवा खंडित होऊ शकते, अशी माहिती खासगी भ्रमणध्वनी कंपनीमार्फत देण्यात आली आहे.



## तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी मोतीराम गायकर

। नागोठणे । प्रतिनिधी ।

नागोठण्याजवळील पाटणसई ग्रामपंचायतीच्या तंटामुक्त गाव समितीच्या अध्यक्षपदी पाटणसई गावातील सामाजिक कार्यकर्ते मोतीराम गोपाळ गायकर यांची निवड करण्यात आली आहे. पाटणसई ग्रामपंचायतीची १३ ऑगस्टची कोरम अभावी तहकूब झालेली ग्रामसभा पाटणसई ग्रामपंचायतीच्या कै. देविदास गणपत गायकर सभागृहात १९ ऑगस्ट रोजी घेण्यात आली. यावेळी सर्वानुमते मोतीराम गायकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

या ग्रामसभेला रोहा पंचायत समितीचे माजी सभापती सदानंद गायकर, ग्रामसेविका शर्मिला ठाकूर, पोलीस पाटील वैशाली गायकर, शिवराम गायकर, दीपक महाडिक, मंदार कोतवाल आदींसह ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

# गावठी भाज्यांची आवक वाढली

। खांब । प्रतिनिधी ।

पाऊस सुरू झाल्यापासून जंगल भागात मिळणाऱ्या रानटी भाज्या सुरूवातीला मोठ्या प्रमाणावर विक्रीसाठी येऊ लागल्या होत्या. तर आता श्रावण महिना सुरू झाल्यापासून गावागावात पिकविल्या जाणाऱ्या गावठी भाज्यांचीही आवक रोहे तालुक्यात मोठ्या प्रमाणावर वाढली आहे.

गावातील परसबागेत तसेच शेतीच्या बांधावर पिकविल्या जाणाऱ्या या भाज्या ताज्या तसेच रासायनिक खतांचा कमीत कमी वापर केला जात असल्याने शहरी भागातील रहिवासी वर्गाला चांगल्या पसंतीस पडत आहेत. साधारणतः रोहिणी नक्षत्राच्या मुहूर्तावर या भज्यांच्या बियांची लागवड ग्रामीण भागातील शेतकरी आपआपल्या परसबागेत, शेताच्या बांधावर तसेच मोकळ्या जागेत तर वरकस भागामध्ये माळरानावर व डोंगर उतारावर या भाज्या पिकवतात. तर आदिवासी समाजबांधव देखील डोंगराळ भागात दळी तयार करून या भाज्यांची निर्मिती करतात. यामध्ये सर्वसाधारपणे वांगी, मिरची, भेंडी, शिराळा, घोसाळे, कारळे, काकडी, दुधी, भोपळा, माठ, आळूची पाने आदी भाज्यांचा समावेश असतो. जास्तीत जास्त सेन्द्रीय खताचा वापर केल्याने या भाज्या प्रदूषणमुक्त व आरोग्यास हितकारक असल्याने ग्राहक वर्गाच्या चांगल्याच पसंतीस पडतात.

ग्रामीण भाग व वरकस भागातून मोठ्या प्रमाणावर भाजी विक्रेते थेट शहराकडे विक्रीसाठी घेऊन येत असल्याने शहरातील नागरिक तसेच बाजारहाटासाठी येणाऱ्या नागरिकांना एकाच जागेवर सर्व भाज्या मिळत



असल्याने सोईस्कर वाटतात. सध्या उपवासाचे दिवस असल्याने या भाज्यांना चांगली मागणी मिळत आहे. त्यामुळे भाजी विक्रेत्यांनाही चांगला रोजगार मिळत आहे.

# पंढरपूर वारीमुळे समाज जिवंत: विवेक रावकर

। नागोठणे । प्रतिनिधी ।

वारीचे आपल्या नाभिक समाजावर फार उपकार आहेत. त्या उपकाराची जाणीव ठेऊन आपण सर्वांनी वारीला योगदान दिले पाहिजे. वारीने आपल्याला कीर्तनकार, प्रवचनकार, माळकरी, टाळकरी तसेच धारकरीदेखील दिले आहेत आणि त्यांचा योग्य उपयोग करून घेणारे छत्रपती शिवाजी महाराजदेखील या वारीने आपल्याला दिलेले आहेत. वारीमुळेच समाज जिवंत असल्याचे प्रतिपादन नाभिक समाजाचे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते विवेक रावकर यांनी केले आहे.



नाभिक समाजाचे थोर संत श्री संत शिरोमणी सेना महाराज यांची पुण्यतिथी बुधवारी (दि.२०) ग्रामदैवत श्री जोगेश्वरी माता मंदिर प्रांगणातील श्री संत ज्ञानेश्वर मंदिरात साजरी करण्यात आली. आषाढी एकादशीनिमित्त प्रथमच नागोठणे ते पंढरपूर पायी वारी करणारे विवेक रावकर यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. त्यावेळी विवेक रावकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

यानिमित्ताने दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी समाजातील गुणवंत विद्यार्थी व अन्य क्षेत्रात विशेष नैपुण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला.

## सार्वजनिक मंडळांचीही जोरदार तयारी | पनवेल परिसरात उत्साहाचे वातावरण

# ढोल-ताशा पथकांचा सराव अंतिम टप्प्यात

। पनवेल । प्रतिनिधी ।

गणेशोत्सवाचे आगमन आता अवघ्या काही दिवसांवर आले आहे. त्यामुळे पनवेल परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण होऊ लागले आहे. गणेशोत्सवासाठी पनवेल, नवीन पनवेल, करंजाडे, कामोठे, खांदा वसाहत या भागांतील विविध गणेशोत्सव मंडळे तयारीला लागली आहेत. तर दुसरीकडे गणेशाचे आगमन व विसर्जन करतेवेळी गणेशभक्तांना तालात ठेका धरण्यास भाग पाडणाऱ्या ढोल-ताशा पथकांनी आपला सराव जोरात सुरू केल्याचे दिसून येत आहे.



पनवेल परिसरातील विविध उड्डाणपुलांखाली, मोकळ्या जागा, काही ठिकाणच्या मैदानात ही ढोल-ताशा पथके आपल्या सहकाऱ्यांसह सकाळ-संध्याकाळ येथे सराव करताना दिसत आहेत. ही पथके ढोल-ताशा, झांज यांचा एक विशिष्ट ताल धरण्यासाठी गेल्या महिन्याभरापासून सराव करत आहेत. त्यासाठी काही पथकांना यंदा नवीन वाद्यसामग्री खरेदी केल्याचे पहायला मिळत असून, त्यातून ते पारंपरिक व आधुनिक तालांचा संगम साधण्याचा प्रयत्न करत आहेत. गणेशोत्सवात भव्य मिरवणुका, आगमन व विसर्जन सोहळ्यात ढोल-ताशांचा गजर महत्त्वाचा मानला जातो. ढोल-ताशांचा गजर नसेल तर गणरायाचे आगमन आणि विसर्जन काय कामाचे, असे सारी गणेश मंडळ मानतात. त्यामुळे सर्वोत्तम वादन करणाऱ्या ढोल-ताशा पथकांच्या शोधात गणेश मंडळ असतात. त्यांच्या कानावर आपल्या सरावाचा ठेका पडावा व गणरायाच्या आगमनाची व विसर्जनाची ऑर्डर आपल्याला मिळावी, यासाठी ही ढोल-ताशा पथके अधिकाधिक सराव करत असल्याचे वास्तव पनवेल परिसरात ठिकठिकाणी समोर येत आहे. दरम्यान, त्यांच्या सरावाचा ताल कानावर पडू लागताच आजूबाजूचे नागरिकदेखील स्वतःचे मनोरंजन करण्यासाठी तेथे गर्दी करताना पहायला मिळत आहेत. त्यामुळे या पथकांच्या उत्साहात भर पडत असून, ते अधिकाधिक चांगला सराव करताना दिसत आहेत. त्यातच अनेक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी आतापासूनच मंडपाची सजावट व परिसरात विद्युत रोषणाई करून गणेशोत्सवाचा आनंद लुटण्याची तयारी सुरू केली आहे. त्यातच सकाळ संध्याकाळी ढोल-ताशा पथकांच्या सरावाचा नाद नागरिकांच्या कानावर पडत असल्याने नवी मुंबई परिसरात यंदा गणेशोत्सव मोठ्या थाटात साजरा होणार असल्याचे चित्र आहे.

## म्हसळा सार्वजनिक वाचनालयाची सर्वसाधारण सभा

। म्हसळा । प्रतिनिधी ।

केशवराव खांबेटे सार्वजनिक वाचनालय म्हसळा या तालुका वाचनालयाची वार्षिक सर्वसाधारण सभा (दि.२०) सकाळी १०.३० वाजता वाचनालयाच्या सभागृहात पार पडली. यावेळी अहवाल वर्षात जागतिक, देश पातळीवर मृत्युमुखी पडलेल्या मान्यवरांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर मागील सभेचे इतिवृत्त वाचन, लेखापरीक्षण अहवाल वाचन, २०२४-२५ मधील जमाखर्चास मंजुरी, आर्थिक वर्ष २०२५-२०२६ चे अंदाजपत्रक वाचन व मंजुरी याविषयावर उपस्थित सदस्यांनी साधकबाधक चर्चा केली. याप्रसंगी उपस्थित झालेल्या प्रश्नानां खजिनदार सुनिल उमरोटकर, सचिव अशोक काते यांनी समर्पक उत्तरे दिली.

यावेळी दिलीप कांबळे, अशोक काते, सुनील उमरोटकर, पांडुरंग पाटील, शिरीष समेळ, प्रा. आर.एस. माशाले, उदय करडे, सायली चोगले, प्राची मेदांडकर उपस्थित होते.



# गणेशभक्तांसाठी आरोग्यविभाग महामार्गावर

## आरोग्याची काळजी घेण्यासाठी दहा ठिकाणी पथक; ४० कर्मचाऱ्यांची नियुक्ती

**| रायगड | प्रतिनिधी |**

गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आरोग्य विभाग सज्ज होत आहे. मुंबई गोवा महामार्गावर २३ ऑगस्ट ते १० सप्टेंबर दरम्यान १० ठिकाणी आरोग्य विभागाचे पथक कार्यरत असणार आहे. जिल्हाधिकारी किशन जावळे व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली ही पथके स्थापन करण्यात आली आहेत.



गणेशोत्सव २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर दरम्यान साजरा करण्यात येणार आहे. कोकणात घरा-घरात गणपती मूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात येते. गणेशोत्सवासाठी मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पालघर येथून मोठ्या प्रमाणात चाकरमानी आपापल्या गावी जाण्यासाठी मुंबई-गोवा महामार्गावरून प्रवास करतात. यामुळे महामार्गावरील वर्दळीत मोठ्या प्रमाणात वाढ होते. वाढती वाहतूक लक्षात घेता अपघाताचीही शक्यता निर्माण होते तसेच प्रवाशांना केव्हाही वैद्यकीय गरज भासू शकते, हे लक्षात घेऊन आरोग्य विभाग सज्ज झाला आहे.

चाकरमानी शक्यतो २३ ऑगस्टपासून आपापल्या गावी जाण्यासाठी प्रवास करतील अशी शक्यता आहे. यामुळे २३ ऑगस्टपासून मुंबई गोवा महामार्गावर १० ठिकाणी आरोग्य पथक नेमण्यात येणार आहे. या आरोग्य पथकात दिवस रात्र १ वैद्यकीय अधिकारी, १ आरोग्य सेविका, १ आरोग्य कर्मचारी, १ वाहनचालक आवश्यक त्या प्राथमिक औषोधपचाराच्या साहित्यासह कार्यरत असणार आहे. तसेच आरोग्य पथकाला रुग्णवाहिका उपलब्ध करून दिली जाणार आहे. गणेशभक्तांना वैद्यकीय सुविधेत कोणतीही कमतरता भासणार नाही. याची खबरदारी आरोग्य विभाग घेत असल्याची माहिती, जिल्हा आरोग्य अधिकारी मनिषा विखे यांनी दिली आहे.

### पथकाची ठिकाणे

खारपाडा (जिते), खारपाले, वाकण, कोलाड, इंदापूर, माणगाव, लोणेरे, महाड (मोपराब्रिज), महाड एमआयडीसी (टोलफाटा), पोलादपूर (लोहारमाळ)

गणेशोत्सवाच्या निमित्ताने चाकरमानी तथा गणेशभक्त कोकणाच्या रायगडमध्ये येणार आहेत. मुंबई-गोवा महामार्गावर गणेशभक्तांच्या सेवेसाठी आरोग्य यंत्रणा तैनात करण्यात आली आहे. आपटा फाटा ते पोल-ादपूर पर्यंत दहा ठिकाणी आरोग्य पथके असणार आहेत. प्रत्येक पथकामध्ये वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी असे एकूण चार जणांचा समावेश असणार आहे. दहा पथकांमध्ये चाळीस कर्मचाऱ्यांचे नेमणूक करण्यात आली असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली.

> गणेशोत्सवाच्या निमित्ताने कोकणात येणाऱ्या भक्तांच्या आरोग्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली. दहा पथके ठिकठिकाणी असणार आहेत. मुबलक औषधांचा साठा, तज्ज्ञ वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी अशी यंत्रणा या कालावधीत असणार आहे. प्रवास करत असताना चाकरमान्यांची प्रकृती बिघडल्यास त्यांच्यावर योग्य ते उपचार करण्यासाठी पथके ठेवण्यात आली आहेत.
>
> – डॉ. मनिषा विखे, जिल्हा आरोग्य अधिकारी

# निवडक



## मुरुडला वाहतूक कोंडीचे ग्रहण

**आगरदांडा :** मुरुड शहरात वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. वाहन चालक आपली वाहने रस्त्याच्या दोन्ही बाजूस गाड्या बिनधास्तपणे लावत आहेत. त्यात आपल्या गाडी जवळ उभे न राहता गाडी बंद करून निघून जात असल्याने वाहतूक कोंडी होत आहे. याचा त्रास सामान्य नागरिकांना होत आहे. तरी ट्रॉफीक पोलिसांनी यांच्यावर कडक कारवाई करावी असे नागरिकांतून बोलले जात आहे.

## आदिवासी प्रतिष्ठानकडून छत्री वाटप

**पाली :** नेहमीच सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या आदिवासी प्रतिष्ठान च्या माध्यमातून रायगड जिल्हा परिषदेच्या सुधागड तालुक्यातील नेणवली शाळेत येथे स्वातंत्रदिनानिमित्त विद्यार्थ्यांना छत्री वाटप कार्यक्रम करण्यात आले. तर दिलीप गणपत कोंडे यांस कडून शाळेकरिता कपाट भेट देण्यात आले. याबद्दल शाळेतील मुख्याध्यापक राजेंद्र अंबिके यांनी आदिवासी प्रतिष्ठान व दिलीप कोंडे यांचे आभार मानले. या कार्यक्रमास आदिवासी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सचिन शंकर सागळे, मुख्याध्यापक राजेंद्र आंबिके, शिक्षक गणपत वरगडे, रवींद्र हंबीर, शंकर जाधव, प्रशासन अधिकारी धनंजय पाटील, नेणवली गावच्या पोलीस पाटील अनुष्का चव्हाण, नागाव पोलीस पाटील विद्या कोंडे, ग्रामसेवक डी. के. पाटील, शाळा समिती अध्यक्ष मनोहर कोंडे, उपाध्यक्ष गुलाब वाघमारे, शिक्षण तज्ञ महेंद्र पडवळ, ग्रामस्थ माजी सरपंच तुकाराम पडवळ, शांताराम कोंडे व ग्रामस्थ गोपीनथ जाधव, गणपत मगर, संदीप कोंडे, धोंडूराम गोळे, रावजी शिंदे, सहदेव मगर, शंकर शिंदे, अंगणवाडी सेविका सुनंदा जाधव आदी ग्रामस्थ व महिला तसेच तरुण वर्ग उपस्थितीत होता.

## मोतीबिंदू चिकित्सा शिबीर

**कर्जत :** सद्भाव फाऊंडेशन मुंबई शाखा आणि लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट पनवेल व ऊक्रुळ ग्रामपंचायत साई महिला बचत गट संगीता खडे यांच्या संयुक्त विद्यमानाने मोफत मोतीबिंदू चिकित्सा शिबीर आयोजित करण्यात आले होते. मारुती मंदिर ऊक्रुळ येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदभाव फाऊंडेशनच्या प्रकल्प अधिकारी सुनंदा लाड व उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमास नीलिमा थोरवे, योगेश थोरवे, राजेंद्र हजारे, संगिता खडे, रुपाली थोरवे, वैभव म्हसे, अर्चना म्हसे, पंकज म्हसे, प्रगती पाटील, पूजा दगडे, संतोष ढाकवळ, विनोद पाचघरे, डॉ. अक्षदा गायकवाड, मैथिली मराठे उपस्थित होते. या शिबिरात १०० रुगणांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी १४ जणांना मोतीबिंदू झाल्याची आढळून आले. त्यांना ऑपरेशनसाठी पनवेल येथे नेण्यात आले.

## बिलाल मोरबेकर यांचा गुणगौरव

**चणेरा :** रोह्यातील सामाजिक क्षेत्रात सक्रीय असलेले सामाजिक कार्यकर्ते बिलाल मोरबेकर यांना सपत्नीक स्वातंत्र्य दिनाचे औचित्य रोहा पोलीस प्रशासनकडून पोलिस निरीक्षक मारुती पाटील यांच्या हस्ते सामजिक कार्याबद्दल सन्मानित करण्यात आले. रोहा खालचा मोहल्ला येथील रहिवासी बिलाल अकबर मोरबेकर यांनी समाजातील नागरिकांसाठी तसेच अबाल वृध्दांसाठी उल्लेखनीय व स्तुत्य असे सामाजिक कार्य केले आहे. रोहा पोलीस स्टेशन यांच्या कार्यक्षेत्रात गरजूंना मदत करणे, महिला सुरक्षा विषयी जनजागृती करणे, पर्यावरण



संवर्धन तसेच स्वच्छता मोहिम राबवणे, युवक मार्गदर्शन शिबीर राबवणे, जनजागृती मोहिम राबवणे आदी उपक्रमांमध्ये त्यांनी उत्साहाने सहभागी होऊन कार्य करत आहेत.

त्यांच्या या कार्याचे कौतुक करत मोरबेकर यांनी पुढील काळात सामाजिक कार्य करून लोकांची सेवा करावी, त्यांच्या कार्यामुळे इतरांनाही समाजसेवेची प्रेरणा मिळावी अशी भावना पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांनी व्यक्त केली. बिलाल मोरबेकर यांनी निःस्वार्थ भावनेने सामाजिक कार्यात सहभाग घेतला. त्यांची ही कामगीरी लक्षणीय व कौतुकास्पद आहे. त्यांच्या या सामाजिक कार्यामुळे समाजात सकारात्मक बदल घडण्यास मदत होत आहे. अशा जबाबदार नागरिकांमुळे समाज अधिक सुरक्षित सुसंस्कृत व एकत्रित होतो. या त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन हे रोहा पोलीस विभागाच्या वतीने गुणगौरव प्रमाणपत्र देऊन सन्मानीत करण्यात आले. त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन रोहा पोलीस विभागाच्या वतीने गुणगौरव करण्यात आले. बिलाल मोरबेकर यांचा सन्मान झाल्याबद्दल सामाजासह सर्व क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन व कार्याचे कौतुक होत आहे.

# जीवघेण्या खड्ड्यांमुळे जनतेचा संताप

**| सुधागड | प्रतिनिधी |**

पाली खोपोली महामार्गावरील खड्ड्यांनी सुधागड तालुक्यातील जनतेचे जीवन अक्षरशः संकटात टाकले आहे. प्रवास म्हणजे जीवघेणं आव्हान बनले असून, अपघातांचे प्रमाण वाढले आहे. अनेक वाहनचालक गंभीर जखमी झाले आहेत, तर काहींनी आपला जीव गमावला आहे.



गणेश चतुर्थी काही दिवसांवर येऊन ठेपली असताना, कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांसाठी हा महामार्ग अत्यंत महत्त्वाचा आहे. मात्र, आजही या मार्गावर खड्ड्यांची अवस्था जशीच्या तशी आहे. प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि संबंधित विभाग यांचे ठोस दुर्लक्ष जनतेच्या जिवाशी खेळत आहे. या मार्गावरील खड्ड्यांमुळे केवळ वाहतूकच विस्कळीत झाली नाही, तर नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही गंभीर झाला आहे. प्रशासनाच्या उदासीनतेमुळे जनतेचा संयम संपत चालला आहे. आता या खड्ड्यांवर राजकीय आणि सामाजिक दबाव वाढत असून, तात्काळ उपाययोजना न झाल्यास तीव्र आंदोलन होण्याची शक्यता आहे.

> गेल्या कित्येक बैठका, आढावा सभा, विशेष आम सभा झाल्या, पण एमएसआरटीसीचे अधिकारी एकदाही उपस्थित राहिले नाहीत. हे केवळ निष्क्रियता नाही, तर जनतेच्या जिवाशी थट्टा करत आहेत.
>
> – राजेश परदेशी, परळी ग्रामपंचायत सदस्य



बैल पोळा सणाला पनवेलच्या ग्रामीण भागात शेतकरी आपल्या लाडक्या बैलांना सजवतात, त्याची पूजा करून गोड धोड खायला घालतात. मात्र, पनवेलमध्ये मोजक्या शेतकऱ्यांकडे बैल आहेत, त्यामुळे पनवेलच्या कुंभारवाड्यामध्ये बैल पोळ्या करीत मातीचे बैल रंगविताना कलाकार. (छायाचित्रः राजेश डांगळे)

# कृषीदूतांकडून ग्रामीण कृषी जागरूकता

**| महाड | प्रतिनिधी |**

महाडमध्ये शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती व्हावी यासाठी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली संलग्न श्री भैरवनाथ निसर्ग मंडळ संचलित कृषी महाविद्यालय मोहोप्रे-आ-चळोली महाडच्या कृषिदूतांनी गोंडाळे गावात ग्रामीण कृषी जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम २०२५-२६ अंतर्गत हरितक्रांतीचे शिल्पकार डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांची जन्मशताब्दी व शाश्वत शेतीदिनानिमित्त कृषी माहिती केंद्र व रानभाज्या प्रदर्शन आयोजित केले होते. त्यामध्ये त्यांनी डॉ. एम. एस. स्वामीनाथन व शाश्वत शेतीदिनाबद्दल माहिती दिली तसेच दापोली कृषी विद्यापीठाने विकसित केलेल्या विविध फळांच्या व जनावरांच्या जाती भाताच्या जाती या सर्वांची माहिती त्याचबरोबर विविध अवजारे, बियाणे आणि रानभाज्या या सर्वांची सविस्तर माहिती शेतकऱ्यांना दिली. त्याचबरोबर शेतीसंबंधीत काही मॉडेल्स देखील तयार करून दाखवले. त्यामध्ये त्यांनी समोच्च शेती, हरितगृहामधील शेती, उभी शेती असे काही मॉडेल्स तयार केले होते. या प्रदर्शनामध्ये त्यांनी शेती संबंधित सेंद्रिय व जैविक खतांची देखील ओळख करून दिली.



या प्रदर्शनासाठी उपस्थित महाड तालुक्याचे तहसीलदार महेश शितोळे व तालुका कृषी अधिकारी धीरज तोरणे, किरण कोकरे, मुग्धा पिंजरकर, आशिष खताते, घनश्याम शेडगे, किशोर मांडवकर, अजय गावंडे, बार-गजे, वाडीकर यांच्यासह शाळेतील विद्यार्थी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. व्ही. जे. गिम्हवणेकर, डॉ. एस. एस. रायकर, प्राध्यापक व्हि. ए. घुले, ऋत्विक शितोळे, श्रेयस भागवत, निखिल धुमाळ, प्रणव शितोळे, विनायक यमगर, अनुराग सोनवणे, ओंकार गोटे, रेवत गवई यांनी कृषी माहिती केंद्र व रानभाज्या प्रदर्शन पार पाडले.

# फ्लाईंग रेस्क्यू टीमला सन्मानपत्र प्रदान

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन येथील फ्लाइंग बर्ड्स रेस्क्यू टीमने दिलेल्या निःस्वार्थ सेवेबद्दल जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणतर्फे फ्लाइंग बर्ड्स रेस्क्यू टीमला आदिती तटकरे यांच्या हस्ते सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे, रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल उपस्थित होते. फ्लाइंग बर्ड्स रेस्क्यू टीमच्या वतीने समीर साठविलकर यांनी सन्मानपत्र स्वीकारले. संस्था परिसरातील आपत्कालीन परिस्थिती,रस्त्यावर वाहन अपघात झाल्यास मदत करणे, समुद्रात बुडणाऱ्या लोकांचे जीव वाचवणे, समुद्र, नाले आणि खोल खड्ड्यातील मृतदेह बाहेर काढणे, प्राण्यांना वाचवणे, रुग्णवाहिकांची व्यवस्था करणे, स्थानिक पोलिसांच्या आवाहनानुसार श्रीवर्धन तालुक्यात तसेच तालुक्या बाहेर शक्य तितकी मदत आणि बचाव कार्य करीत आहे.

पथकाचे नेतृत्व हिदायत जमादार, शोएब हमदुले, समीर साठविलकर, जुनैद दुस्ते, शादाब पटेल, इजाज कुमार, नितीन पतंगे, अफाक भोरे, अली झांजो, सुजित भोकरे, आबिद पावसकर करीत आहेत.

# इमारतीत घुसून मंगळसूत्र लुटले

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेलच्या करंजाडे भागातील समर्थ आंगण सोसायटीच्या आवारात घुसून लिफ्टमध्ये जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या विवाहितेवर हल्ला करीत तिच्या गळ्यातील ५० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र चोरांनी खेचून पलायन केल्याची घटना उघडकीस आली आहे. पनवेल शहर पोलिसांनी या चोरांचा शोध सुरू केला आहे.

पनवेलच्या करंजाडे सेक्टर ४ भागातील समर्थ आंगण सोसायटीत राहणारी अनुराधा धोत्रे (२५) ही विवाहिता बाजारात खरेदीसाठी गेली होती. इमारतीच्या लिफ्टजवळ पोहोचली असताना एका लुटारूने लिफ्टमध्ये जाण्यासाठी उभ्या असलेल्या अनुराधाला मागून जोरात धक्का दिला. यामुळे ती खाली कोसळल्यानंतर लुटारूने तिच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावले.

# आगलेची वाडीतील तरुणांनी दिले समुद्री कासवांना जीवदान

**| रेवदंडा | प्रतिनिधी |**

रेवदंडा ग्रामपंचायत हद्दीतील थेरोंडा आगलेचीवाडी परिसरात घडलेली एक अनोखी घटना ग्रामस्थांमध्ये चर्चेचा विषय ठरली आहे. समुद्रकिनाऱ्यावर फेरफटका मारायला गेलेल्या स्थानिक युवकांच्या सतर्कतेमुळे आणि धाडसामुळे दोन दुर्मीळ कासवांचे प्राण वाचले. आगलेचीवाडी बंधाऱ्याजवळ दुपारी १२ वाजताच्या सुमारास काही युवक किनाऱ्यावर



फिरत असताना, खाडीजवळ मच्छीमारांनी टाकलेल्या जाळ्यात दोन प्रचंड आकाराची समुद्री कासवे तडफडताना दिसली. साधारणपणे पाच ते सहा फूट लांब असलेली ही कासवे जाळ्यात घट्ट अडकून जिवाच्या आकांताने सुटण्यासाठी झुंजत होती. ही माहिती मिळताच सचिन बळी, सुशांत बळी, कुलदीप बळी, संजय जावसेन, महेश हाडके आणि सुधाकर हाडके या सहा धाडसी युवकांनी कोणतीही वेळ न दवडता घटनास्थळी धाव घेतली. कासवे प्रचंड आकाराची असल्याने जाळी सोडवताना युवकांना बराच त्रास सहन करावा लागला. समुद्राच्या लाटांचा मारा, कासवांची तडफड आणि जाळीची गुंतागुंत या सगळ्यात धोका होता. मात्र, संयम आणि चिकाटी ठेवून त्यांनी जवळजवळ अर्ध्या तासाच्या प्रयत्नानंतर दोन्ही कासवे सुखरूपपणे जाळ्यातून मुक्त केली. यानंतर युवकांनी या दोन्ही कासवांना परत समुद्राच्या खोल पाण्यात सोडून दिले. मुक्त झाल्यावर कासवे लाटांबरोबर सहजपणे समुद्रात विलीन झाली आणि उपस्थित ग्रामस्थांनी सुटकेचा निःश्वास टाकला. या संवेदनशील कृतीमुळे गावात कौतुकाची लाट उसळली आहे.

**संततधारेमुळे जनजीवन विस्कळीत** | **सहा वर्षातील सर्वाधिक पाऊस**

# माथेरानमध्ये पावसानी नोंदवला उच्चांक

**| नेरळ | प्रतिनिधी |**

**कर्जत तालुक्यातील थंड हवेचे ठिकाण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माथेरानमध्ये मागील सहा वर्षानंतरचा एका दिवसातील सर्वाधिक पाऊस २० ऑगस्ट रोजी नोंदला गेला. यावर्षी मे महिन्यापासून पावसाळा सुरू झाला असला तरी गतवर्षी आजच्या दिवसाची सरासरी माथेरानमधील पाऊस गाठू शकला नाही.**

माथेरान हे ब्रिटिश काळात शोध लागलेल्या माथ्यावरील रान म्हणून ओळख असलेल्या गावाला वृक्षराईचा वेढा आहे. या गावात शेकडो वर्षांपूर्वीची झाडे असून ५४ चौरस किलोमीटरमध्ये पसरलेल्या माथेरानमध्ये झाडेच झाडे चहूकडे अशी स्थिती आहे. पूर्वी माथेरानमधील पाऊस हा धुव्वाधार असायचा आणि त्यावेळी ५००० मिलीमीटर इतका पाऊस होत होता. मागील काही वर्षे याच माथेरान मधील धुव्वाधार पाऊस अनुभवण्यासाठी पावसाळ्यात चार महिने पर्यटकांची तुडुंब गर्दी असते. मागील काही वर्षात माथेरानने पावसाळ्यातील उच्चांक नोंदवला आहे.



माथेरानमध्ये जुलै आणि ऑगस्ट दरवर्षी चांगला पाऊस सुरु असतो. त्यात सतत संततधार पावसाने माथेरानमधील जनजीवन विस्कळीत झाले होते. मागील चार पाच दिवस माथेरानमध्ये धुंवाधार पाऊस सुरू होता. त्यात २० ऑगस्ट रोजी माथेरान मध्ये ४३८ मिली इतका पाऊस झाला.२० आणि २१ ऑगस्ट या दोन दिवशी माथेरानमध्ये तब्बल ७९२ मिली इतका पाऊस झाला असून सलग दोन दिवसात झालेला हा माथेरानचे इतिहासातील सर्वाधिक पाऊस आहे. तर एका दिवशी झालेल्या सर्वाधिक पावसाच्या यादीत यावर्षी २० ऑगस्ट रोजी झालेला ४३८ मिली इतका पाऊस २०१९ नंतरचा सर्वाधिक पाऊस समजला जात आहे. २०१९ मध्ये तीन ऑगस्ट रोजी माथेरानमध्ये ढगफुटी सदृश पाऊस झाला होता आणि काही तासात पावसाची नोंद ४४० मिली पावसाची नोंद झाली होती.

गतवर्षी माथेरानमधील पावसाची सरासरी ही ५९०७ मिली एवढी होती आणि आज पर्यंत झालेल्या पावसाची नोंद ही ४२३७ मिली इतकी आहे. यावर्षी मे महिन्याचे पाच तारखेपासून अवकाळी पाऊस सुरू झाला तो मान्सून पाऊस घेऊनच आला. त्यात २५ मे रोजी आलेला महापूर हा इतिहासातील मे महिन्यात आलेला पहिलाच महापूर समजला जात आहे.

**यावर्षीचा सरासरी पाऊस – ४२३७ मिली**
**यावर्षीचा सर्वाधिक पाऊस– २० ऑगस्ट ४३८ मिली**
**गतवर्षीचा एकूण पाऊस– ५९०७ मिली**
**गतवर्षी आजच्या तारखेपर्यंतचा पाऊस– ४५११मिली**

सतत पाऊस सुरू असून देखील पावसाची आजच्या दिवसापर्यंत ची सरासरी ही मागील वर्षापेक्ष कमीच आहे. आजपर्यंत माथेरानमध्ये ४२३७ मिली इतका पाऊस झाला असून गतवर्षी २०२४ मध्ये आजच्या दिवशी झालेल्या पावसाची नोंद ही ४५११ मिली इतकी होती.

मात्र हा पाऊस माथेरानमध्ये पर्यटकांना खेचून आणण्यात यशस्वी ठरला असून जून महिन्यापासून पावसाळ्यात माथेरान शहरात येणारे पर्यटक यांची संख्या ही दररोज काही हजार एवढी वाढली आहे. पावसाळा सुरू झाल्यापासून एकही विकेंड हा गर्दीविना गेलेला नाही. त्यामुळे जानेवारी ते एप्रिल या महिन्यातील पर्यटकांचा माथेरानकडे झालेला कानाडोळा यावर्षी पावसाळा सुरू झाल्यानंतर भरून निघाला आहे. त्यामुळे माथेरानचे पर्यटन पर्यटकांच्या गर्दीने भरले आहे.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- बोलेरो पिकवर ड्रायव्हर पाहिजे. ९४२२१५१४५१
- शिवानी पेट शॉप अलिबाग/चोंढी/पेण/तळोजा येथे कामाकरिता कमीत कमी १२ वी पास मुलगी पाहिजे. ९२७२३८३४७६.
- अलिबाग शहराच्या मध्यभागी २ बीएचके टेरेस फ्लॅट. एस.टी. स्टँड, कॅटामरन बस स्टॉप पासुन चालत ५ मिनटाचे अंतरावर सुसज्ज, २ एसी सह. इन्व्हर्टर फिटींग, ईलेक्ट्रिक गीझर, किचन ट्रॉली व बऱ्याच सुविधा. त्वरा करा, अत्यंत मोक्याचे ठिकाण व सोयीसुविधांनी सुसज्ज. संपर्क. ७८७५५६०८१/ ९४२३३७७६०८/७७४१००२३०८
- अलिबाग येथील ऑफिस कामाकरीता इंग्लिश व मराठी टायपिंग येणारी टायपिस्ट पाहिजे. मोबाईल नं. ९१४६६२४५१०. वेळ सकाळी १० ते ६

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# चोरट्यांनी सोन्यासह कॅमेरा चोरला



**। खोपोली । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात चोरट्यांनी धुमाकूळ घा-तला असताना आता चोरट्यांनी आपला कल खालापुर तालुक्यात वळवला आहे.

यामध्ये चौक येथील चोरीची घटना ताजी असताना खालापूर पोलीस ठाणे हद्दीतील डोळवली येथील प्रदीप हडप यांच्या घरात कोणी नसताना चोरट्यांनी १६ ऑगस्टच्या पहाटेच्या सुमारास घरात मागच्या दाराने प्रवेश करत चोरी केली. प्रदीप हडप नावंढे गावात गेले असता चोरट्यांनी या संधीचा फायदा घेत पहाटे प्रदीप हडप यांच्या डोळवली येथील घरात मागच्या दाराने दरवाजा तोडून घरात शिरगाव करत कपाट तोडून कपाटातून दीड तोळ्याचा मंगळसूत्र व सोनी कंपनीचा कॅमेरा चोरून नेल्याने डोळवली परिसरात घबराटीचे वातावरण आहे.

# जनरेटरची चोरी

**। नेरळ । प्रतिनिधी।**

उमरोली गावातील व्यक्तीच्या मालकीचे जनरेटर चोरीला गेले आहे. दोन लाख रुपये किमतीचे जनरेटर बंद दुकानाचे शटर फोडून चोरी करण्यात आले. रमण शेळके यांच्या दुकानाच्या गाळ्याचे बांधकाम सुरू आहे. त्या बांधकाम आणि वेल्डिंग कामासाठी विजेची आवश्यकता आहे. वीज वारंवार खंडित होत असल्याने शेळके यांनी वीजपुरवठा मिळावा यासाठी जनरेटर आणले होते. जनरेटर ठेवलेल्या दुकानाच्या गाळ्याला लावलेले शटर फोडून जनरेटर चोरून नेले. जनरेटर चोरीला गेल्याबद्दल शेळके यांनी पोलिसात तक्रार दिली आहे.




## कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

### निविदा अधिसूचना

उप मुख्य अभियंता (कार्य), कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी, पात्र कंत्राटदारांकडून खालील कामासाठी आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदा प्रणालीद्वारे एकल लिफाफा बोली पद्धतीने खुल्या निविदा मागवित आहे: **कामाचे नाव:** महाराष्ट्र राज्यातील कोकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागातील माणगाव स्थानकावर प्रवाशांसाठी 2 लिफ्टची सुविधा उपलब्ध करून देणे. **निविदा अधिसूचना क्रमांक : केआर-आरएन-डिव्हायसीई डब्ल्यूएमएनआयएलआयएफटी2025-27 दिनांक: 22/08/2025**, **एकूण अंदाजित खर्च:** ₹19,31,499.29/- (जीएसटी वगळून) **निविदा सुरू होण्याची तारीख:** 29/08/2025, **निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:** 12/09/2025 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत ऑनलाईन बोली/ऑफर सादर करता येतील. काम पूर्ण करण्याची मुदत: मॉन्सून वगळता 6 महिने. हस्तलिखित प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. तपशील व सहभागासाठी कृपया https://www.ireps.gov.in या संकेतस्थळास भेट द्या. सर्व सुधारणा/परिशिष्टे याच संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जातील.


## जाहीर नोटीस

जिल्हा रायगड, तालुका अलिबाग पैकी, मौजे चेंढरे हद्दीमधील खालील वर्णनाची जमीन मिळकत अजित हरिश्चंद्र कोळगावकर, अनघा अजित कोळगावकर, अखिल अजित कोळगावकर, आदिती अजित कोळगावकर, सुमन हरिश्चंद्र कोळगावकर सर्वजण मुक्काम चेंढरे हे आमचे अशिल आणि विनायक हरिश्चंद्र कोळगावकर व त्यांचे मुलगे संदेश, हितेश आणि हरीश यांचे सहमालकीची आहे.

चेंढरे सर्व्हे नंबर १०६, हिस्सा नंबर १अ या मिळकतीपासून तयार झालेल्या बिनशेती भूखंडांपैकी खालील भूखंड-

| अनु. | बिनशेती भूखंड क्रमांक | क्षेत्र चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| १ | २३ | ३८६८ | २=३४ |
| २ | २४ | १८१ | ५०=६८ |
| ३ | २५ | ३३२ | ९२=९६ |

आमचे अशिलांसह अन्य सहमालकांनी सदर मिळकतींबाबत शार्दूल बिल्डर्स अँड डेव्हलपर्स तर्फे भागीदार प्रशांत फुलगावकर वगैरे यांचेबरोबर सन २०१८ मध्ये विकसन करारनामा केला असून, तयार होणाऱ्या इमारतींपैकी अे, बी व सी या तीन इमारतींपैकी ४५ टक्के बांधीव क्षेत्र आमचे अशिल व इतर सहमालकांना सदर करारानुसार डेव्हलपर यांनी द्यायचे आहे.

सदर विकसन करारनाम्यास अनुसरून डेव्हलपर यांनी वर नमूद जमीन मिळकतीवर बांधकाम करण्याची परवानगी नगरपरिषद अलिबाग यांचेकडून मिळवली असून, सदर परवानगी काही विशिष्ट अटींसह देण्यात आली आहे. सदर जमीन मिळकतीवर असणारे नगरपरिषदेचे ''स्टाफ क्वार्टर्स'' चे आरक्षण शिथिल करण्याकरिता नगरपरिषदेने त्यांच्या कर्मचाऱ्यांकरिता मंजूर आराखड्यापैकी ''ई'' ही इमारत डेव्हलपर यांचे खर्चाने बांधून देण्याबाबत अट परवानगीमध्ये घातली असून, त्याची पूर्तता डेव्हलपर यांनी प्रथमतः करायची आहे.

मात्र शार्दुल बिल्डर्स अँड डेव्हलपर्स यांनी नगरपरिषदेने घातलेल्या अटींची पूर्तता न करता, ज्या ठिकाणी सदर स्टाफ क्वार्टर्ससाठी बांधकाम करायचे आहे ते ''ई'' या इमारतीचे बांधकाम सुरू देखील न करता, अ आणि सी या दोन इमारतीचे बांधकाम पूर्ण केले आहे. शिवाय मंजूर आराखड्यातील अनुज्ञेय असणाऱ्या तळमजला आणि त्यावर चार मजले यापेक्षा आणखी एक मजल्याचे वाढीव बांधकाम देखील डेव्हलपर यांनी आमचे अशिलांची व इतर सहक्कदारांची मान्यता न घेता बेकायदेशीरपणे करण्यास सुरुवात केली आहे. त्याचप्रमाणे डेव्हलपर यांनी बी या इमारतीचे बांधकामास अजूनही सुरूवात केलेली नाही व विकसन करारनाम्यानुसार आमचे अशिल आणि इतर सहहक्कदारांना देय असणारे बांधीव क्षेत्रापैकी अंशतः क्षेत्र ताब्यांत दिले असून, अंशतः क्षेत्राचा ताबा अजून डेव्हलपर यांनी आमचे अशिलांस दिलेला नाही.

अशाप्रकारे वाढीव बेकायदेशीर बांधकाम करून डेव्हलपर यांनी त्यापैकी बांधीव क्षेत्र विकण्याचा त्यांचा इरादा असल्याचे प्रत्यक्ष बोलण्यादरम्यान आमचे अशिलांस सांगितले असून, तसे करण्याचा डेव्हलपर यांस हक्क असल्याची भाषा डेव्हलपर यांनी चालू केली आहे. प्रत्यक्षात असा अधिकार डेव्हलपर यांस देण्यात आलेला नाही. नगरपरिषदेने बांधकाम परवानगी देताना घातलेली प्रमुख अट डेव्हलपर यांनी न पाळल्यामुळे सदर प्रकरणी दिलेली परवानगी देखील नगरपरिषद रद्द करण्याची शक्यता आहे. सदर प्रकल्पाकरिता डेव्हलपर यांनी ''रेरा'' यांचेकडून मान्यता घेतली असल्याने, ''रेरा'' यांचेकडे त्याबाबत योग्य ती तक्रार आमचे अशिल करणार आहेत.

वर नमूद केल्यानुसार डेव्हलपर करीत असलेले सदर वाढीव बांधकाम पूर्णतः बेकायदेशीर असून, आमचे अशिलांस मान्य नाही शिवाय नगरपरिषदेने तशी परवानगी देखील दिलेली नाही. त्यामुळे याबाबत डेव्हलपर यांचेविरूद्ध योग्य ती कायदेशीर कारवाई आमचे अशिल लवकरच सुरू करणार आहेत.

तरी या सर्व कारणांकरिता या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना आमचे अशिलांचे वतीने असे कळवण्यात येते की, शार्दुल बिल्डर्स अँड डेव्हलपर्स यांनी बेकायदेशीरपणे बांधलेल्या क्षेत्रापैकी कोणतेही क्षेत्र कोणीही विकत घेऊ नये अगर अन्य कोणत्याही प्रकारे त्याबाबत व्यवहार करू नये. त्याचप्रमाणे मूळ जमीन मालक यांस देय असणारे बांधीव क्षेत्र प्रत्यक्षात दिल्याशिवाय आणि नगरपरिषदेच्या स्टाफकरिता देय असणारे बांधीव क्षेत्र बांधून नगरपरिषदेस हस्तांतरित केल्याशिवाय सदर बांधकाम प्रकल्प कायदेशीर ठरणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी व त्यामध्ये कोणत्याही प्रकारे गुंतवणूक कोणी करू नये. अन्यथा सदर व्यक्तीची फसवणूक होण्याची आणि नुकसानी होण्याची शक्यता आहे याची सर्वांनी नोंद घ्यावी.

तारीख : २०/०८/२०२५

सही/-
**ॲड. राजेंद्र मधुसूदन कुंटे**
शांतादुर्गा को.ऑप.हौसिंग सोसायटी,
मारुती नाका, अलिबाग, रायगड.
९२७०१६२९२९/९४२२६८९१७०

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीप्रमाणे नमुद मौजे गोंधळपाडा, ता.अलिबाग, जि.रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक श्री.विश्वास शांताराम राऊत, यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे

**मौजे गोंधळपाडा, ता.अलिबाग, जि.रायगड**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| गोंधळपाडा ता.अलिबाग | ४९/१/२/क | ०-४९-५०<br>पो.ख. ०-०५-५०<br>एकुण क्षेत्र ०-५५-०० | ७.८३ |

वर नमुद जमिन मिळकतींपैकी विश्वास शांताराम राऊत यांच्या मालकीचे क्षेत्र ०-१७-५० हे.आर., पो.ख. ०-०२-५० हे.आर. एकुण क्षेत्र ०-२०-०० हे.आर., आकार २.७७ रु.पैसे या मिळकतीपैकी क्षेत्र ०-०३-०० हे.आर., हि जमिन मिळकत.

दिनांक : २२/०८/२०२५
अशिलांची सही

**ॲड.समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता: फ्लॅट नं.१०३. पहिला मजला,
बी विंग, मारेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल हे खालील वर्णनाची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक वृषाली पंकज पाठारे, रा.गोंदाव, ता.सुधागड, जि.रायगड हिचे कडून कायम खरेदी करणार असून तशी बोलणी आमचे अशिल व मिळकतीचे मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे- हातोंड, तालुका- सुधागड, जिल्हा - रायगड**

| गट नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|
| ५२९ | ०-०८-१० | ०.२७ |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीच्या मालकानी आमचे अशिलांस दिली असून, मिळकतीचे मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ८(आठ) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : २२/०८/२०२५

सही/-
**ॲड. नोएल सॅमसन चिंचोलकर**
मु.पो. पाली. एकतापथ,
ता.सुधागड, जि.रायगड, ४१०२०५
मो.नं.९२७१९२३९०३

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे चई. ता.कर्जत, जि.रायगड**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| १६/१ | एकूण क्षेत्र ०-१७-०० हे.आर | ०.१२ |
| १६/५ | एकूण क्षेत्र ०-२९-०० हे.आर | ०.१९ |
| १६/११ | एकूण क्षेत्र १-२६-०० हे.आर | ०.६६ |
| १६/१३ | एकूण क्षेत्र ०-४३-०० हे.आर | ०.२२ |
| १६/१७ | एकूण क्षेत्र ०-२०-०० हे.आर | ०.०९ |
| १५/८/ब | एकूण क्षेत्र ०-३१-०० हे.आर | ०.२८ |
| १९/५ | एकूण क्षेत्र १-६०-०० हे.आर | ०.६९ |
| १६/४ | एकूण क्षेत्र २-५७-०० हे.आर | १.१२ |
| १६/६/ब | एकूण क्षेत्र ३-००-०० हे.आर | २.६२ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३(तीन) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : २२/०८/२०२५
ठिकाण : पनवेल

सही.
**ॲड. रोहित रो.मानकवळे**
मो.नं ९०२८८१७९३०
पत्ता - शॉप नं. २३, प्लॉट नं.५१, कल्पतरु कॉम्प्लेक्स, सेक्टर ०९ खांदा कॉलनी पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६


## कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

### खुली ई-निविदा आमंत्रण सूचना

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडतर्फे, प्रादेशिक विद्युत अभियंता, केआरसीएल, रत्नागिरी यांच्यावतीने पुढील कामासाठी खुली ई-निविदा मागवण्यात येत आहे. **कामाचे नाव** – कोकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागातील करंजाडी स्थानकावरील लूप लाईन क्र. 2 वरील विस्तारित व्हार्फसाठी 16 मीटर हाय मास्टचा पुरवठा, उभारणी, चाचणी व कार्यान्वयन. **निविदा क्र. केआर/आरएन/ईएल/टी/12/2025, दिनांक 22/08/2025**, **अंदाजित किंमत** : ₹ 6,45,841/- (जीएसटी वगळून) **निविदा दस्तऐवजाची किंमत** : नाही, **ईएमडी** : ₹ 12,900/- (किंवा आयआरईपीएस पोर्टलवर दर्शविल्याप्रमाणे) **निविदा सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ (ऑनलाईन)** : 12/09/2025 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत. अधिक माहितीसाठी प्रादेशिक विद्युत अभियंता, एमआयडीसी क्षेत्र, मिरजोळे, रत्नागिरी यांच्याशी संपर्क साधावा किंवा रेल्वेची अधिकृत वेबसाइट www.ireps.gov.in वर भेट द्यावी.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमचे अशिल श्री. वैभव मदन म्हात्रे रा. मु.बहिरमपाडा, पो.कामार्ले, ता.अलिबाग, जि.रायगड यांस खाली वर्णन केलेल्या मिळकतीचा साठेकरार त्या मिळकतीचे विद्यमान मालक १.सुशीला रामचंद्र नागावकर उर्फ राजश्री रामचंद्र नागावकर २.संतोष हरिश्चंद्र भगत, ३.वनिता अनंत शिंगरुत ४. सुभाष अनंत शिंगरुत ५.गणेश अनंत शिंगरुत ६. सचिन अनंत शिंगरुत ७.माधुरी महेश पाटील, ८.पुष्पलता परशुराम म्हात्रे सर्व रा.वाघोली, पो. कामार्ले, ता.अलिबाग, जि.रायगड यांनी दि.१८/१२/२०२३ रोजी करुन दिलेला आहे. अशी परिस्थिती असताना सदर मिळकतीची बेकायदेशीरपणे आमचे अशिलांची फसवणूक करुन खाली नमूद केलेल्या मिळकतीचे वर नमूद विद्यमान मालक हे बेकायदेशीरपणे खाली नमूद केलेल्या मिळकतींमध्ये त्रयस्थ ईसमांचे हक्क हितसंबंध तयार करण्याचे तयारीत आहेत. अशी खात्रीलायक बातमी आमचे अशिलांस समजलेली आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| वाघोलीवाडी ता.अलिबाग, जि.रायगड | १३०/२ | ०-२३-२०<br>पो.ख.०-०१-७०<br>०-२४-९० | ४-०० |

तरी मिळकतीसंदर्भात सुशिला रामचंद्र नागावकर उर्फ राजश्री रामचंद्र नागावकर वगैरे वर नमुद मालक यांनी अथवा तत्सम इतर कोणीही व्यक्तींनी वर नमूद मिळकतींसंदर्भात कोणत्याही प्रकारचा खरेदी-विक्रीचा व्यवहार करू नये. तसा कुठलाही व्यवहार आमचे अशिलांचे अपरोक्ष केल्यास व आमचे अशिलांचे हक्कास कमीपणा येईल असा व्यवहार केल्यास त्या व्यवहारास आमच्या अशिलांची सक्त हरकत असेल. व तसे केल्यास सदर व्यक्ती सदर मिळकतीचे प्रामाणिक खरेदीदार (Bonafide Purchaser) होणार नाहीत. तसेच अशा प्रकारचा कोणताही व्यवहार आमच्या अशिलांवर बंधनकारक असणार नाही. तरी कोणत्याही प्रकारचा खरेदी-विक्रीचा व्यवहार केल्यास भविष्यातील कोर्टकारवाईस संबंधीत इसम जबाबदार राहतील हे कळावे.

अलिबाग,
दि. २१-०८-२०२५.

**ॲड.आर.बी.कोसमकर**
चिरायु बिल्डींग, राम मंदिर शेजारी
ब्राम्हण आळी अलिबाग

## पनवेल महानगरपालिका
**ता.पनवेल, जि.रायगड**

### जाहिर सूचना

**पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग बांधवाच्या आरोग्य उपचार व पुर्नवसन सेवा राबविण्याबाबत फिजिओथेरपी व मल्टी-डिसीप्लनरी थेरपी पुर्नवसन केंद्राकरीता जागा भाडेतत्वावर घेणेबाबत.**

मा.आयुक्त, पनवेल महानगरपालिका दिव्यांग बांधवांसाठी फिजिओथेरपी व मल्टी-डिसीप्लनरी थेरपी पुर्नवसन केंद्र सुरु करणेकरीता महापालिका क्षेत्रात ७००० ते ८००० चौ. फुट जागा तळमजला अथवा तळमजला + पहिला मजला (उद्वाहक यंत्र असल्यास) भाडेतत्वावर घेणेकामी इच्छुक व्यक्ती/संस्था यांचेकडून अर्ज मागविणेत येत आहेत. सदरील जागा/इमारत ही बांधकाम पूर्ण असलेली, वाहनतळ व शौचालय या सुविधांयुक्त असाव्यात. जागा/इमारत भाडेतत्वावर घेणेचा कालावधी २ वर्षांचा असेल

इच्छुक व्यक्ती/संस्था यांनी जागेचे ठिकाण, भाडे इ.तपशीलासह अर्ज पनवेल महानगरपालिकेच्या pmcmalmatta2018@gmail.com या मेलआयडीवर अथवा प्रत्यक्ष कार्यालयात दि. ०२/०९/२०२५ रोजी दुपारी १२.०० पर्यंत जमा करावेत.

सही/-
**उप आयुक्त, मालमत्ता**
**पनवेल महानगरपालिका**

जा.क्र.पमपा/माव्य/९९२५/प्र.क्र.८०/५८४/२०२५
दिनांक :- २१/०८/२०२५

दिनांक : २२ ऑगस्ट २०२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१(एकवीस) दिवसांत कळवावे. मुदती मध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे हेदवली, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १) जनाबाई जोमा पाटील<br>२) दिपक जोमा पाटील | १९ | ३ | ०-७७-०० | २ | ५१ |
| | यापैकी लिहून देणार यांचे हिस्याचे विक्री केलेले क्षेत्र हे ००-४०-०० इतके | | | | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु.पो.कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१

सही / -
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो.नं.९१५८२७७७२८
दिनांक :-२२/०८/२०२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली बिनशेती जमिन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडून आमचे अशिल आशा शिवाजी खैरे यांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा चार्ज, ताबेकब्जा कुलमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४(चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचाही हरकत न आल्यास आमचे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या बिनशेती जमिन मिळकत मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**मौजे :- पाषाणे, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत :-**

| मालकांचे नाव | स.नं./प्लॉट नं. | क्षेत्र : हे.आर.चौ.मीटर | आकार |
|---|---|---|---|
| सुजाता बापु साबळे | २४१/१४ | २.४१.०० (२४१ चौ.मी) | २४.१० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता: सदनिका क्रं.१०८,
पहिला मजला, विंग बी, लक्ष्मी अपार्टमेंट
बांधिवली, ता.कर्जत, जि.रायगड.
ठिकाण : कर्जत

सही/-
**ॲड. सुर्यकांत भाऊ मसणे**
दिनांक : २२/०८/२०२५
मो.नं. ९९२२१५५१५३

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री उत्तम मंडळ, श्री मदन कृष्णा कामत, यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे डोणे, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं १/२ एकुण ०.४५.५० गुंठे पैकी ०.२९.५० विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हित संबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशिलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक : २२/०८/२०२५

**ॲड देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस ह्या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिलाने मौजे खारगाव, ता.श्रीवर्धन, जि.रायगड येथील गट नं.१५१, एकूण क्षेत्र ०-२७-००, आकार ०.५३ इतक्या क्षेत्राची मिळकत विद्यमान मालक श्री. शौकत अ.रहीम राऊत, रा.खारगाव, ता.श्रीवर्धन, जि.रायगड यांच्याकडून जाण्या-येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह कायम विकत घेणेची ठरवली आहे. तशा आशयाची बोलणी आमच्या आशिलांनी संबंधीत जमिन मालकांन सोबत केलेली आहे. मिळकत ही निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत मिळकत मालकांचे म्हणणे असून ती त्यांच्या आजपर्यंत ताबे कब्जात व वहिवाटीत आणि मालकी हक्कात असुन प्रत्यक्ष कसवणुकीखाली आहे.

वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा, पावती, अखत्यारपत्र, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टी, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, लीन, लीज, बक्षिसी, ट्रस्ट, पोटगी, वारसा किंवा कोणत्याही प्रकारच्या दस्ताने अथवा अन्य कोणत्याही प्रकारची कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास, तसेच नमुद मिळकतीच्या हद्दी खुणांवरुन कोणाचीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५(पंधरा) दिवसाचे आत संबंधीतांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहीत (समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने) खाली सही करणार खरेदीदस्ताने वकील यांचेकडे पाठवावे व वकिलाची खात्री पटवून द्यावी.

विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाराहीत आहे. असे समजून सदर मिळकतीवर आता कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत. असे गृहीत धरुन आमचे अशिल संबंधीत मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर मागाहून उपस्थित करण्यात येणारी कोणाचीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वानी नोंद घ्यावी.

श्रीवर्धन
दिनांक : २२/०८/२०२५
कार्यालयीन पत्ता
रा.महेश्वर आळी, श्रीवर्धन,
ता.श्रीवर्धन, जि.रायगड

सही/-
**अतुल अरविंद चौगुले**
खरेदीदाराचे वकील
मो.नं.७२७६५६३६६७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्तीबरोबर अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुलमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थानी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : रजपे ता: कर्जत जि.रायगड येथील जमिन मिळकत :-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं | हिस्सा नं | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रूपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १.आशा विजय घुडे<br>२.विजय पांडुरंग घुडे<br>३.सुशील विजय घुडे<br>४.संदिप विजय घुडे | १९ | | ०-८१-९० | २ | ६२ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :-
रिबेल्स एम्पायर, फ्लॅट नं २०२/२०३
आनंदी हाईटस, बाळासाहेब भवनाच्या वर,
अमराई रोड, कर्जत ता: कर्जत
जि: रायगड ४१०२०१

**ॲड. महेश कमलाकर थोरवे**
दिनांक २२/०८/२०२५
मो.नं ८००७५३७६५६
ई मेल: advmthorve@gmail.com

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्तीबरोबर अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुलमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थानी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७(सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन**
**मौजे: पाचखडकवाडी ता.कर्जत जि.रायगड येथिल जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं | हिस्सा नं | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रूपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १. राम गणपत जांभळे<br>२. लक्ष्मण गणपत जांभळे | १८ | २ | ०-१४-०० | ० | ०९ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे
कार्यालयीन पत्ता :-
रिबेल्स एम्पायर,फ्लॅट नं २०२/२०३
आनंदी हाईटस, बाळासाहेब भवनाच्या वर,
अमराई रोड, कर्जत ता: कर्जत
जि: रायगड ४१०२०१

**ॲड. महेश कमलाकर थोरवे**
दिनांक : २२/०८/२०२५
मो.नं ८००७५३७६५६
ई मेल: advmthorve@gmail.com

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## 3rd CALL TO SRM E-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender Specification.

| | |
|---|---|
| **Tender No. : E-Tender - 04/2025-26**<br>**Name of Tender :** 3rd Call to E-Tender for work of unloading of EHV materials/ equipments by crane & labours at Major Stores, Panvel for FY 2025-26.<br>**Tender Fee :-** Rs. 500 /- + applicable GST<br>**RFx No.- 7000036615** | **Online Downloading the RFx :**<br>Dt. 22.08.2025, 00:00 Hrs. to 31.08.2025, 23:59 Hrs.<br>**Online Submission of the RFx :**<br>On or Before Dt. 31.08.2025, 23:59 Hrs.<br>**Online Opening of the Techno Commercial RFx :**<br>Dt. 01.09.2025, at 10:00 Hrs. (If possible ).<br>**Online Opening of the Price bid :**<br>Dt. 01.09.2025, at 15:00 Hrs. (If possible) |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The Executive Engineer, Mobile No. 8275215120
**Note :** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Sd/-**
**Suresh Suradkar**
**Executive Engineer**
**Major Stores, Panvel**



# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# भारत-पाकिस्तान द्विपक्षीय मालिका रद्द

## केंद्र सरकारची स्पष्ट भूमिका, ऑपरेशन सिंदूरनंतर प्रथमच दोन्ही संघ आमनेसामने

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

आशिया चषक २०२५ ९ सप्टेंबरपासून खेळवला जाणार आहे. या स्पर्धेत भारत आणि पाकिस्तान या संघांमध्ये १४ सप्टेंबरला सामना खेळवला जाणार आहे. पहलगाम दहशतवादी हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरनंतर प्रथमच दोन्ही संघ आमनेसामने येणार आहेत. यादरम्यान भारताने पाकिस्तानविरूद्ध सामन्यावर बहिष्कार टाकावा, अशी चर्चा सुरू आहे. दरम्यान क्रीडा मंत्रालयाने याबाबतची भूमिका स्पष्ट केली आहे.



भारत आणि पाकिस्तानचे संघ द्विपक्षीय मालिका खेळत नाहीत. २००८ मध्ये मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर दोन्ही संघांमधील द्विपक्षीय मालिका खेळण्यावर भारताने बंदी घातली. फक्त आयसीसी स्पर्धा आणि आशिया चषकामध्ये दोन्ही संघ आमनेसामने येतात. याबाबतही क्रीडा मंत्रायलायने वक्तव्य केले आहे. मंत्रालयाने भारताच्या आंतरराष्ट्रीय क्रीडा सहभागासंबंधी नवी धोरणं जाहीर केली असून त्यात पाकिस्तानविरूद्ध सामन्यांवर विशेष भर देण्यात आला आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार सांगितले की हे धोरण तत्काळ लागू करण्यात आले आहे.

भारत आणि पाकिस्तान संघांदरम्यान क्रिकेट मालिका होणार नाही पण आयसीसीतर्फे आयोजित विश्वचषक, चॅम्पियन्स ट्रॉफी तसंच आशियाई क्रिकेट परिषदेतर्फे आयोजित आशिया चषकसारख्या स्पर्धेत भारतीय संघ सहभागी होईल असे क्रीडा मंत्रालयाने म्हटले आहे.

भारताचे पाकिस्तान प्रति धोरण हे दोन देशांदरम्यानच्या क्रीडा संबंधांमध्येही प्रतीत होते, असे क्रीडा मंत्रालयाने म्हटले आहे. धोरणामध्ये पुढे नमूद केले आहे, की, भारत आणि पाकिस्तान यांच्यातील क्रिकेट मालिकांसाठी भारतीय संघाला पाकिस्तानात जाऊन खेळण्याची परवानगी नसेल. तसेच पाकिस्तान संघालाही भारतात येऊन सामने खेळण्याची परवानगी दिली जाणार नाही. पण बहुपक्षीय स्पर्धांमधील सहभागांवर परिणाम होणार नाही.

क्रीडा मंत्रालयातील एका सूत्राने सांगितलं की, आशिया कप ही बहुपक्षीय स्पर्धा असल्यामुळे आम्ही भारतीय क्रिकेट संघाला त्यामध्ये खेळण्यापासून रोखणार नाही. पण पाकिस्तानला द्विपक्षीय मालिकेसाठी भारतात खेळण्याची परवानगी नसेल. क्रीडा मंत्रालयाच्या या निर्णयामुळे आता आशिया चषक स्पर्धेतील भारत-पाकिस्तान सामन्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे आशिया चषक स्पर्धेत भारतीय संघाला पाकिस्तानविरुद्ध खेळण्यापासून रोखले जाऊ शकत नाही, असे क्रीडा मंत्रालयाच्या सूत्रांनी सांगितले आहे.

### ऑलिम्पिक चार्टरचे पालन

**क्रीडा मंत्रालयाचे हे धोरण केवळ क्रिकेटसाठीच लागू होणार नाही, तर त्यात इतर खेळांचाही समावेश असेल. याचा अर्थ आता कोणताही पाकिस्तानी खेळाडू कोणत्याही स्पर्धेसाठी भारतात येऊ शकणार नाही आणि कोणताही भारतीय खेळाडू पाकिस्तानमध्ये जाऊ शकणार नाही. पण आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये दोन्ही संघ किंवा खेळाडू एकमेकांविरुद्ध खेळताना दिसतील.**

## पाच खेळाडूंची पद्म पुरस्कारासाठी शिफारस

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

क्रीडा मंत्रालयाने पॅरिस ऑलिंपिक २०२४ मध्ये भारतासाठी पदक जिंकणाऱ्या खेळाडूंची नावे पद्मश्रीसाठी पाठवली आहेत. जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धा जिंकणाऱ्या डी गुकेशचाही या यादीत समावेश आहे. पॅरिस ऑलिंपिकमधील पदक विजेत्या खेळाडूंव्यतिरिक्त, डी गुकेशचे नाव देखील पाठवण्यात आले आहे.गेल्या वर्षी हा पुरस्कार अनुभवी फिरकी गोलंदाज आर अश्विन आणि माजी हॉकी गोलकीपर पीआर श्रीजेश यांना देण्यात आला होता. गेल्या वर्षी ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये झालेल्या पॅरिस ऑलिंपिक स्पर्धेत भारताने ६ पदके जिंकली होती. यामध्ये एक रौप्य आणि ५ कांस्य पदकांचा समावेश होता. नीरज चोप्रा आणि गोलकीपर पीआर श्रीजेश यांना आधीच पद्मश्री पुरस्कार मिळाला आहे. नीरज-श्रीजेश व्यतिरिक्त मनु भाकर, सरबजोत सिंग, स्वप्नील कुसाळे आणि अमन सेहरावत यांची नावे पाठवण्यात आली आहेत.

# निवडक

## मेस्सीचा ८७५ गोलांचा टप्पा पार



**मियामी :** आधुनिक फुटबॉलचा अनभिषिक्त सम्राट लायोनेल मेस्सीने इंटर मियामी क्लबकडून खेळताना त्याने आपल्या व्यावसायिक कारकिर्दीतील ८७५ वा गोल नोंदवत एक ऐतिहासिक टप्पा गाठला. हा पराक्रम करणारा तो जगातील सर्वात तरुण आणि सर्वात कमी सामने खेळलेला खेळाडू ठरला आहे. इंटर मियामीने लॉस एंजेलिस गॅलेक्सी संघावर ३-१ ने मिळवलेल्या विजयात मेस्सीने हा मैलाचा दगड पार केला. दुखापतीमुळे काही काळ मैदानाबाहेर राहिल्यानंतर मेस्सीने केवळ ४५ मिनिटांच्या खेळातच आपली जादू दाखवली. त्याने प्रतिस्पर्धी संघाच्या बचावफळीला भेदत मारलेला अप्रतिम गोल डोळ्यांचे पारणे फेडणारा होता. हा त्याचा केवळ १११६ सामन्यांमधील ८७५ वा गोल ठरला, जो एक विश्वविक्रम आहे. मेस्सीच्या या सोनेरी कारकिर्दीची सुरुवात १ मे २००५ रोजी झाली होती, जेव्हा त्याने बार्सिलोनासाठी वयाच्या १७ व्या वर्षी आपला पहिला व्यावसायिक गोल केला होता. तेव्हापासून सुरू झालेला प्रवास अर्जेंटिना, पीएसजी, इंटर मियामी असा सुरू आहे. मेस्सी आता ख्रिस्तियानो रोनाल्डोपेक्षा (९३८ गोल) केवळ ६३ गोलांनी मागे आहे.

## नीरज चोप्राची ब्रुसेल्स स्पर्धेतून माघार

**नवी दिल्ली :** सलग दोन ऑलिंपिकमध्ये पदक पटकावत भारतासाठी ऐतिहासिक कामगिरी करणारा भालाफेकपटू नीरज चोप्रा बेल्जियम येथील ब्रुसेल्स येथे होत असलेल्या डायमंड लीगमधील एका लेगमध्ये सहभागी होणार नाही; मात्र तरीही भारताच्या या पठ्ठ्याने डायमंड लीगच्या अंतिम फेरीचा पात्रता मिळवली आहे. डायमंड लीगची अंतिम फेरीत स्वित्झर्लंडमधील झुरिच येथे होणार आहे. विश्वविजेता नीरज चोप्रा याने पार पडलेल्या डायमंड लीग पोलंडमधील स्पर्धेत सहभाग घेतला नव्हता. तसेच ब्रुसेल्स येथे होत असलेल्या स्पर्धेतही त्याच्या सहभागावर प्रश्नचिन्ह होते; पण आता तो ब्रुसेल्स येथील स्पर्धेत खेळणार नसल्याचे समजले आहे. नीरज याने यंदाच्या मोसमातील डायमंड लीगमधील दोनच स्पर्धांमध्ये सहभाग घेतला. एका स्पर्धेत विजेता अन्य एका स्पर्धेत उपविजेता होण्याचा मान संपादन केला. त्याने या दोन स्पर्धांमधून १५ गुणांची कमाई केली. केशोर्न वॉलकॉट १७ गुणांसह पहिल्या स्थानावर असून, ज्युलियन वेबर १५ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. नीरज चोप्रा १५ गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे. ब्रुसेल्स येथे २२ ऑगस्टला डायमंड लीगमधील एक सत्राची स्पर्धा रंगणार आहे. या स्पर्धेनंतर गुणतालिकेत अव्वल सहा क्रमांकावर असलेल्या खेळाडूंना डायमंड लीग अंतिम फेरीसाठी पात्र ठरता येणार आहे..भारतीय पठ्ठ्याचे प्रदर्शनभारताचा नीरज चोप्रा अखेरची स्पर्धा ५ जुलै रोजी खेळला. त्याने स्वत: ही स्पर्धा भारतामध्ये आयोजित केली होती. या स्पर्धेमध्ये त्याने ८६.१८ मीटर भाला फेकून विजेता होण्याचा मान संपादन केला. तसेच मे महिन्यात दोहा येथे झालेल्या डायमंड लीगमध्ये त्याने ९०.२३ मीटर भाला फेकला; पण नीरजला दुसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले. ज्युलियन वेबर याने पहिला क्रमांक पटकावला. या स्पर्धांमध्ये विजयी होणाऱ्या खेळाडूंनाही आर्थिक रूपात बक्षिसे देण्यात येणार आहेत.

## मँचेस्टर युनायटेडवर निसटता विजय

**मँचेस्टर :** प्रीमियर लीगच्या अटीतटीच्या सामन्यात, रिकार्डो कॅलाफिओरीने पूर्वार्धात नोंदवलेल्या एकमेव गोलच्या जोरावर अर्सेनलने मँचेस्टर युनायटेडचा त्यांच्याच घरच्या मैदानावर १-० असा पराभव केला. यासह अर्सेनलने लीगमध्ये विजयी सलामी दिली, तर युनायटेडच्या नव्या हंगामाची सुरुवात पराभवाने झाली. सामन्याच्या सुरुवातीपासूनच अर्सेनलने आक्रमक पवित्रा घेतला होता. १३ व्या मिनिटाला मिळालेल्या कॉर्नर किकवर अर्सेनलने ही निर्णायक आघाडी घेतली. विल्यम सालिबाने जोरदार हर्लला चढवल्यानंतर युनायटेडचा गोलरक्षक अल्ताय बायिंदिरने एका हाताने चेंडू अडवण्याचा केलेला प्रयत्न फसला आणि चेंडू थेट जवळच उभ्या असलेल्या इटालियन खेळाडू कॅलाफिओरीकडे गेला. कॅलाफिओरीने कोणतीही चूक न करता सोपा हेडर मारून चेंडूला जाळीचा रस्ता दाखवला. एक गोलने पिछाडीवर पडल्यानंतर मँचेस्टर युनायटेडने सामन्यात परतण्याचा जोरदार प्रयत्न केला. दुसर्या सत्रात तर त्यांनी खेळावर पूर्णपणे वर्चस्व गाजवले. मॅथियस कुन्हा, ब्रायन एमब्युमो आणि पॅट्रिक डोरगु यांनी गोल करण्याचे अनेक चांगले प्रयत्न केले, पण अर्सेनलचा गोलरक्षक डेव्हिड रायाने ते सर्व निष्फळ ठरवले. एमब्युमोचा एक शक्तिशाली हेडर त्याने झेप घेत थोपवला. सामना संपल्यानंतर युनायटेडचे खेळाडू निराश होऊन मैदानावर बसले होते, तर दुसरीकडे अर्सेनलच्या चाहत्यांनी वन-निल टू द आर्सेनल हे पारंपरिक गीत गाऊन विजय साजरा केला. या सामन्यात युनायटेडने ६२ टक्के चेंडूवर ताबा ठेवत २२ शॉटस् मारले, तर अर्सेनलला केवळ ९ शॉटस् मारता आले. मात्र, एका गोलमुळे सामन्याचा निकाल त्यांच्या बाजूने लागला.

## तपस्याला कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदक

**नवी दिल्ली :** जागतिक कुस्ती स्पर्धेत तपस्याने सुवर्णपदक पटकावले. भारतासाठी हे पहिलेच सुवर्णपदक ठरले आहे. अंतिम फेरीत तपस्याने नॉर्वेच्या दोमाजेवाला पराभूत केले, तर उपांत्य फेरीत गतविजेतीला धुळ चारली. तपस्याने जागतिक वीस वर्षाखालील कुस्ती स्पर्धेतील भारताचे पहिले सुवर्णपदक जिंकण्यात यश मिळवले. तिने सामाकोवा (बल्गेरिया) येथे सुरू असलेल्या या स्पर्धेतील महिलांच्या ५७ किलो गटात ही कामगिरी केली.तपस्याने निर्णायक लढतीत नॉर्वेच्या फेलिसितास दोमाजेवाचा ५-२ असा पराभव केला. तपस्याने उपांत्य फेरीत गतविजेत्या सोमाका उचिदा हिला हरवून आपण सुवर्णपदकाचे प्रबळ दावेदार असल्याचे दाखवून दिले होते. तेच नेमके साध्य करताना तिने अंतिम सामन्यांत मोक्याच्यावेळी गुण जिंकले.प्रिया मलिक आणि रीनाने अंतिम फेरीत धडक मारली आहे. वयोगटाच्या स्पर्धेत प्रियाने दुसऱ्यांदा अंतिम फेरी गाठली. तिने ७६ किलो वजनी गटाच्या उपांत्य फेरीत सर्बियाच्या एवलिन उझेलजीला अवघ्या तीन मिनिटांत चीतपट करून १०-० असा विजय मिळवला. प्रियाने याच वजनी गटात ज्युनिअर स्पर्धेत विजेतेपद जिंकले आहे. प्रियाने रशियाच्या डायना तितोवाला ४-० असे एकतर्फी लढतीत हरवले होते.

## पिंच्याक सिलॅट स्पर्धेत पदकांची लयलूट

| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

महाराष्ट्र पिंच्याक सिलॅट असोसिएशनने १५ व्या पिंच्याक सिलॅट राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन १५ ते १७ ऑगस्ट रोजी क्राईस्ट अकॅडमी स्कूल कोपरखैरणे, नवी मुंबई येथे केले होते. या स्पर्धेमध्ये २६ जिल्ह्यातील ४८५ खेळाडूंनी सहभाग नोंदविला. या स्पर्धा प्रि-टेन, सब ज्युनिअर, ज्युनिअर वयोगटातील मुला-मुलींसाठी होत्या.




स्पर्धेमध्ये ४६ सुवर्णपदके २० रजतपदके १२ कांस्यपदके अशी सर्वाधिक पदके मिळवून नवी मुंबई संघ पहिल्या स्थानी तर ४३ सुवर्ण १ रजतपदके मिळवून सांगली जिल्ह्याचा संघ दुसऱ्या स्थानी व १३ सुवर्णपदके १३ रजतपदके, १३ कांस्यपदके मिळवून तिसऱ्या स्थानी नाशिक जिल्ह्याचा संघ राहिला अनुक्रमे चौथ्या स्थानी ८ सुवर्णपदके ८ रजतपदके ८ कांस्यपदके मिळवून अहिल्यानगर जिल्ह्याचा संघ राहिला. स्पर्धेतील विजयी खेळाडूंची निवड २६ ते २८ सप्टेंबर२०२५ रोजी हुबळी कर्नाटक येथे होणाऱ्या १३ व्या राष्ट्रीय पिंच्याक सिलॅट स्पर्धेसाठी करण्यात आली आहे. सर्व स्तरातून विजयी खेळाडूंचे अभिनंदन करण्यात येत आहे.

स्पर्धेचे उद्घाटन शिवाजीराव थोरवे, सुरेंद्र प्रताप सिंग, संजीव पांडे, हरिदास थोरवे, मिथुन जोशी, सुरेखा येवले, सुरेखा पाटील, मुकेश सोनवणे, प्रकाश पार्टे, पोर्णिमा तेली आदी मान्यवरांच्या हस्ते पार पडला. तर बक्षीस वितरण समारंभ औदुंबर पाटील, किशोर येवले, संजय जाधव, तृप्ती बनसोडे, धनंजय जगताप, संकेत धामंडे, अरविंद शिर्के, विलास कांबळे, प्रवीण कुडले, सागर शेलार, योगेश पानपाटील, नागेश बनसोडे दत्ता भवारी, ओंकार मोहिते, आश्विनी राऊत, पल्लवी म्हात्रे व इतर करण्यात आले.

## छेत्रीला शिबिरातून वगळलं

**नवी दिल्ली :** आशियाई करंडक पात्रता फेरीच्या राष्ट्रीय शिबिरामधून सुनील छेत्रीला वगळण्यात आल्यानंतर भारतीय फुटबॉल संघाचे प्रशिक्षक खालिद जमील यांनी आपले मत व्यक्त करताना म्हटले, की सराव शिबिरासाठी सुनील छेत्रीची निवड करण्यात आलेली नाही; मात्र सिंगापूरविरुद्धच्या लढतीसाठी त्याचा संघात प्रवेश होऊ शकतो. त्याच्यासाठी भारतीय संघाचे दरवाजे खुले आहेत.सराव शिबिरासाठीच्या संघ निवडीबाबत सुनील छेत्री याच्यासोबत संवाद साधला. छेत्रीसाठी केव्हाही संघाचे दरवाजे खुले आहेत. सराव शिबिरासाठी काही खेळाडूंच्या खेळाची चाचणी करणे आवश्यक होते.

## राष्ट्रकुलच्या आयोजनावर भारताची बोली

### नोव्हेंबरमध्ये स्थळाबाबत निर्णय

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

वर्ष २०३० अखेरीस होत असलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या आयोजनासाठी भारताकडून अधिकृत बोली लावण्यात आली आहे. भारतीय ऑलिंपिक संघटनेच्या (आयओए) विशेष सर्वसाधारण बैठकीत याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.

भारताला या प्रतिष्ठेच्या स्पर्धा आयोजनाची संधी मिळाल्यास कबड्डी, खो-खो, हॉकी, नेमबाजी, कुस्ती, बॅडमिंटन, तिरंदाजी या हमखास पदक मिळणाऱ्या खेळांचा त्यामध्ये समावेश करण्यात येईल, असा विश्वास आयओएच्या अध्यक्षा पी. टी. उषा यांच्याकडून याप्रसंगी व्यक्त करण्यात आला. यावर्षी नोव्हेंबर महिन्यात २०३० मधील राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या आयोजन स्थळाबाबत अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे..राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या (२०३०) आयोजनासाठी भारत इच्छुक असल्याचे आधीच कळवण्यात आले होते. भारतामधील अहमदाबाद येथे ही स्पर्धा खेळवण्याची योजनाही आखण्यात आली होती, मात्र ३१ ऑगस्टच्या आधी आपण या स्पर्धेच्या आयोजनासाठी बोली लावणार आहोत, हे अधिकृतपणे राष्ट्रकुल क्रीडा संघटनेला कळवणे गरजेचे होते. आता भारतीय ऑलिंपिक संघटनेकडून यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. कॅनडा या देशाने आयोजनातून माघार घेतल्यामुळे भारताला आयोजनपद मिळण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. उषा यांच्यासह आयओएचे सहसचिव कल्याण चौबे यांनीही पदकविजेत्या खेळांच्या समावेशाला हिरवा कंदील दाखवला. ते म्हणाले, ग्लासगो येथील २०२६ मधील होत असलेल्याराष्ट्रकुलक्रीडास्पर्धेमध्ये काही खेळाडूंना डावलण्यात आले आहे, मात्र २०३० मध्ये असे होणार नाही. कबड्डी, खो-खो, हॉकी, नेमबाजी, कुस्ती, बॅडमिंटन, तिरंदाजी या भारताला हमखास पदक मिळणाऱ्या खेळांचा समावेश या स्पर्धेमध्ये केला जाईल.

> **“राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या आयोजनासाठी आम्ही उत्सुक आहोत. ही स्पर्धा आयोजनाची तयारीही करीत आहोत. तसेच ही स्पर्धा फक्त अहमदाबाद येथेच पार पडेल असे नव्हे. भुवनेश्वर व दिल्ली या दोन ठिकाणीही अव्वल दर्जाच्या सुविधा उपलब्ध आहेत. त्यामुळे अहमदाबादसह दिल्ली व भुवनेश्वर येथेही स्पर्धांमधील शर्यती पार पडू शकतील.**
> **-टी. उषा”**

कार्यकारिणी सदस्य रोहित राजपाल यांनीही या वक्तव्याला दुजोरा दिला. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेमध्ये कोणत्या खेळांचा समावेश करण्यात यावा यासाठी नियमावली आहे. तीन गटांमध्ये याची विभागणी केली जाते. पहिल्या गटामध्ये पहिल्यापासून सुरू असलेल्या खेळांना प्राधान्य दिले जाते. जे खेळ पूर्वीपासून यामध्ये समाविष्ट आहेत, अशा खेळांची निवड केली जाते. त्यानंतर ज्या देशामध्ये ही स्पर्धा होणार आहे, त्या आयोजक देशाच्या पसंतीचे खेळ निवडले जातात. शेवटी जादा खेळांचा समावेश करायचा असल्यास अशा खेळांचीही निवड केली जाते.

## भारतीय महिला ऑस्ट्रेलिया विरूद्धच्या सामन्यासाठी सज्ज

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

भारतीय महिला संघाने इंग्लंड दौऱ्यात हरमनप्रीत कौर हीच्या नेतृत्वात ऐतिहासिक कामगिरी केली. भारताने यजमान इंग्लंडचा टी-२० आणि एकदिवसीय मालिकेत पराभव केला. त्यानंतर भारत ए महिला संघ राधा यादव हीच्या नेतृत्वात ऑस्ट्रेलिया दौऱ्याला रवाना झाली. मात्र राधा यादव हीच्या नेतृत्वात भारतीय महिला ए संघाने निराशा केली. ऑस्ट्रेलिया ‘ए’ महिला संघाने भारताचा टी-२० मालिकेत धुव्वा उडवला. ऑस्ट्रेलिया ‘ए’ महिला संघाने भारताला ३ सामन्यांच्या मालिकेत ३-० अशा एकतर्फी फरकाने पराभूत केलं. मात्र त्यानंतर महिला ब्रिगेडने जोरदार कमबॅक केले.



भारतीय महिला ‘ए’ संघाने सलग २ दोन्ही वनडे सामने जिंकत मालिका आपल्या नावावर केली. त्यामुळे भारताकडे सलग तिसरा सामना जिंकण्यासह विजयी हॅटट्रिक करुन टी-२० सीरिजमधील पराभवाची परतफेड करण्याची संधी होती. मात्र ऑस्ट्रेलियाने तिसऱ्या सामन्यात भारताला १०० पेक्षा अधिक धावांच्या फरकाने पराभूत केलं आणि विजय हॅटट्रिक करण्यापासून रोखलं. मात्र त्यानंतरही भारताने ही मालिका २-१ ने आपल्या नावावर केली. त्यानंतर आता ऑस्ट्रेलिया ‘ए’ महिला विरुद्ध भारतीय महिला ‘ए’ संघ यांच्यात ४ दिवसांची अनऑफिशियल टेस्ट मॅच खेळवण्यात येणार आहे.

राधायादवहीचयासामन्यातही भारताचं नेतृत्व करणार आहे. तर ताहिला विल्सन ऑस्ट्रेलियाचं नेतृत्व करणार आहे. भारताचा हा सामना जिंकून ऑस्ट्रेलिया दौऱ्याची सांगता विजयाने करण्याचा प्रयत्न असणार आहे. तर कांगारु भारताला रोखण्यासाठी मैदानात उतरणार आहेत. त्यामुळे या सामन्यात उभयसंघात ४ दिवस चढाओढ पाहायला मिळू शकते.

### वरिष्ठ विभागात अनंत जीतला सुवर्णपदक | संघाची १९ पदकांची कमाई

## भारतीय नेमबाजांची पदकांची लयलूट



| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

भारतीय नेमबाजांची आशियाई अजिंक्यपद स्पर्धेतील पदकांची लयलूट कायम राहिली. ऑलिंपियन खेळाडू अनंत जीत सिंह नारुका याने पुरुषांच्या स्कीट प्रकारात सुवर्णपदक पटकावत दिवस गाजवला. भारतीय खेळाडूंनी ज्युनियर व युथ विभागातही सुवर्णपदक पटकावले. आता भारतीय संघाने १९ पदकांची कमाई केली आहे. यामध्ये नऊ सुवर्णपदकांचा समावेश असून प्रत्येकी पाच रौप्यपदके व कांस्यपदके पटकावण्यात भारतीयांना यश लाभले आहे.

आशियाई नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धा कझाकस्तानमध्ये सुरू आहे. अनंत जीत याने पात्रता फेरीमध्ये ११९ गुणांची कमाई करीत तिसरा क्रमांक पटकावला.

मात्र, अंतिम फेरीत भारतीय खेळाडूने उल्लेखनीय कामगिरी केली. अंतिम फेरीमध्ये आशियाई क्रीडा स्पर्धेतील विजेता मन्सूर राशिदी व अनंत जीत यांच्यामध्ये कडवा संघर्ष पाहायला मिळाला. अनंत जीत याने ५७ गुणांची कमाई करीत सुवर्णपदकाला गवसणी घातली. मन्सूर राशिदी याला ५६ गुणांसह रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. अल इशाक अली अहमद याला ४३ गुणांसह ब्राँझपदकावर समाधान मानावे लागले.

सौरभ - सुरुची जोडीला ब्राँझपदकसौरभ चौधरी व सुरुची सिंग या जोडीने १० मीटर एअर पिस्तूल मिश्र प्रकारात ब्राँझपदक पटकावले. या जोडीने पात्रता फेरीमध्ये ५७८ गुणांची कमाई केली. ब्राँझपदकासाठीच्या लढतीसाठी या जोडीची निवड झाली. सौरभ व सुरुची या जोडीने ब्राँझपदकाच्या लढतीत चीन तैपईच्या लिऊ हेंग यू-सिह सियांग चेन या जोडीवर १७-९ अशी सहज मात केली. महिलांना स्कीटमध्ये ब्राँझपदकभारतीय महिला नेमबाजांनी स्कीटमधील सांघिक विभागात ब्राँझपदक पटकावले. महेश्वरी चौहान, गनीमत सेखो व रायझा ढिल्लो या

भारतीय नेमबाजांनी ३२९ गुणांसह ब्राँझपदक पटकावले. चीनच्या खेळाडूंनी ३४२ गुणांसह सुवर्णपदक पटकावले. कझाकस्तानच्या नेमबाजांनी ३३९ गुणांसह ब्राँझपदकावर हक्क सांगितला. ज्युनियर विभागात अचूक निशाणाभारतीय खेळाडूंनी ज्युनियर विभागातही अचूक निशाणा साधला. वंशिका चौधरी व जॉनाथन गॅव्हीन अँथोनी या जोडीने १० मीटर एअर पिस्तूल मिश्र सांघिक प्रकारात कोरियाच्या किम येजिन-किम दुईयॉन या जोडीवर १६-१४ असा विजय साकारत भारताला सुवर्णपदक मिळवून दिले. गणेश गुप्ता व गामबेरया गौडा या जोडीने एअर पिस्तूल मिश्र सांघिक युथ प्रकारात इराणच्या नेमबाजांना १६-१४ असे नमवत भारताला आणखी एक सुवर्णपदक मिळवून दिले. दरम्यान, ज्युनियर स्कीट महिला विभागात पहिल्या दिवसानंतर अगरिमा कन्वर चौथ्या स्थानावर असून मानसी रघुवंशी सहाव्या स्थानावर आहे. यशस्वी राठोड आठव्या स्थानावर आहे. ज्युनियर स्कीट पुरुषांच्या विभागात हरमेहर सिंग पहिल्या स्थानावर आहे. ज्योतीरादित्य सिसोदिया तिसऱ्या व इशान सिंग पाचव्या स्थानावर आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)